## प्रकरण तिसरे

# 'भोवरा' कथासंग्रहाचा सर्वांगीण अभ्यास

## 'भोवराचे' मूल्यमापन -

रंगराव बापू पाटील 'भोवरा' हा कथासंग्रह सप्टेंबर १९९२ साली प्रकाशित झाला. त्याला १९९३ ला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. या कथासंग्रहाने ग्रामीण कथेमध्ये भर घातलेली आहे. कथासंग्रहामध्ये एकूण नऊ कथा सामाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. त्या सर्व कथा ग्रामीणतेशी नाते सांगणाऱ्या आहेत. ग्रामीण जीवन नागर संस्कृतीपेक्षा नागर जीवनापेक्षा खूप वेगळे असते. ग्रामीण जीवनामध्ये खूपच प्रश्न असतात. त्या प्रश्नामुळे ते लोक गंभीर अस्वस्थ होतात आणि ही अस्वस्थता लेखकाच्या कथांमधून व्यक्त होते. रंगराव बापूंची कथा अशीच विविध प्रश्न घेऊन साकार होते. या कथांचा शोध आपण पुढील मुद्यांच्या आधारे घेऊन 'भोवरा' ह्या कथासंग्रहाचे मुल्यमापन करू.

### १) ग्रामीण कथा

### अ) ग्रामीण प्रदेश

'भोवरा' या कथासंग्रहातील कथा या ग्रामीण कथा आहेत आणि त्या विशिष्ट प्रदेशात घडलेल्या आहेत. त्यामध्ये कामेरी, इस्लामपूर, भडकिंबे, तुजारपूर या परिसरातील वर्णने आलेली आहेत अशा मर्यादीत ग्रामीण प्रदेशात ही कथा घडते आहे. या कथांमधून ग्रानीण जीवन व्यक्त झालेले आहे.

### ब) ग्रामीण प्रीती

'भोवरा' कथासंग्रहातील कथा ग्रामीण आहे. ग्रामीण पातळीवरची प्रीती त्या कथांमधून व्यक्त झालेली आहे. त्यामध्ये 'लूट' सारख्या कथेमध्ये कोंड्या हा तमाशातली सगुणा नावाची स्त्री काढून आणतो आहे. आणि तिच्यावर प्रेम करतो. स्वत:ची काळी जाड बायको त्याला आवडत नाही. 'कैची' कथेमध्ये तर चंदर हा विधवा बाईच घरी आणण्याचा प्रयत्न करतो. 'जोडणी' कथेमधील आंदू हा भात कापायला आलेल्या सुगंधीवर प्रेम करतो आहे. अशा विविध प्रकारची ग्रामीण प्रीती 'भोवरा' कथासंग्रहामधून व्यक्त झालेली आहे.

## क) कौटुंबिक प्रश्न

'भोवरा' कथा संग्रहामधून अनेक कौटुंबिक प्रश्न हाताळलेले आहेत. 'कैची' कथेमधील चंदर हा बाई घरी आणण्याचा विचार करतो आहे. परंतु आपल्या बहिणीचे लग्न अजून झालेले नाही. कुळाला बट्टा लागेल, बहिणीचे लग्न होणार नाही असे रामा चंदरला सांगतो त्यावेळी चंदर कैचीत सापडतो. त्याच्यापुढे कौटुंबिक प्रश्न उभा राहतो. आणि इच्छा असतानासुद्धा तिच्याबरोबर लग्न करता येत नाही.

वैरणीला गेलेला किसन साप पाहून मरगळलेल्या अवस्थेत घरी परततो. आणि त्याच्या बायकोपुढे आपला नवरा असा का करतो आहे या बद्दल प्रश्न निर्माण होतो. हा कौटुंबिक प्रश्न 'फणा' कथेमधून चितारलेला आहे.

'दुपार' कथा कौटुंबिक प्रश्नातूनच निर्माण झालेली आहे. वडिलांना मारलेल्या व्यक्तीचा खून चंदर करतो. परंतु त्या जागेजवळून जाताना त्यांच्या मनात अनेक शंका निर्माण होतात. ती दुपार त्याला अस्वस्थ करून सोडते.

'पाहुणा' या कथेतही कौटुंबिक प्रश्न हाताळलेला आहे. या कथेमध्ये बाळासाबचे लग्न ठरलेले असते. त्याची लग्न करण्याची इच्छा नसते. तो मामाच्या घरी पळून येतो त्यावेळी चाणाक्ष मामा त्याच्या गळ्यात आपली काळी पोरगी बांधतो.

'माघारीण' या कथेत सासू—सून यांचे भांडण हा विषय हाताळलेला आहे. त्यामध्ये बाळूपण आहे. बाळूने बायकोला खूप दिवस माहेरी ठेवलेले असते. नंतर तो तिला घरी आणतो. त्यावेळी भांडण सुरू होते.

ग्रामीण जीवनातील कितीतरी कौटुंबिक प्रश्न 'भोवरा' कथासंग्रहामधून आलेले आहेत. म्हणून रंगराव बापूंची कथा ग्रामीण कथा वाटते.

### ड) आर्थिक तणाव

'भोवरा' कथेमधून लोकजीवन येते. घेतलेल्या किंमतीला पाडं योग्य नाही, हे चंदरच्या लक्षात येते. कारण त्याच्या पाठीवर भोवरा असतो. हे पाडं शेवटी तीनशे रूपयाचा तोटा करून चंदर विकतो. परंतु तरीही पाडं महाग आहे असे म्हणून दलाल निघून जातो. चंदरला मात्र तोटा सहन करावा लागतो. हा प्रश्न लोकसमजुतीच्याबरोबर रंगराव बापू पाटलांनी चितारलेला आहे.

### इ) ग्रामीण निसर्ग

रंगराव बापू पाटील यांच्या 'भोवरा' कथासंग्रहामधून खेड्यापाड्यातला निसर्ग चित्रित झालेला आहे. यामध्ये मळा, डोंगर, पाणंद, शेते, सीताफळीची झाडे, लिंब, बोर, बाभळी माळ इ. निसर्गवर्णन येते. त्याचबरोबर कामेरी, इस्लामपूर, तुजारपूर, भडकंब्याचा रस्ता इ. मधील निसर्गवर्णन येते आणि या निसर्गवर्णनामुळेच त्यांची कथा ग्रामीण कथा ठरते.

### ई) ग्रामीण जीवनाला साहाय्यक मानवेतर जीवनचित्रण

'भोवरा' कथासंग्रहामधून मानवेतर जीवन आलेले आहे. त्यामध्ये पाठीवरती भोवरा असलेल्या एका बैलाचे चित्रण आलेले आहे. भोवरा असणारे जनावर खोडकर असते अशी लोकांची समजूत आहे. याचे चित्रण 'भोवरा' कथेमधून येते. त्याचबरोबर साप, कुत्री, पक्षी यांचे चित्रण पाटील करतात म्हणून ही कथा ग्रामीण कथा आहे.

## उ) ग्रामीण भाषा

रंगराव बापू पाटील यांची 'भोवरा' कथासंग्रहाची भाषा ही ग्रामीण भाषा आहे. अस्सल ग्रामीण अविष्कार तिच्यातून व्यक्त झालेला आहे. प्रत्येक कथा ग्रामीण भाषेत व्यक्त झालेली आहे. खालील ग्रामीण बोलीतील वर्णन पहा –

"तिचंही बराबरच हाय ........ बिग्याचा तू मालक ...... मळादळा हाय ...... बावडी हाय ....... तरणं रगात हाय ....... तीबी सूजीच्या पिटागत गूरी हाय ...... मग ठेवलीस म्हणून तुझ्या का बाची पदरमोड हुतिया? ....... असली रूपवान बाई ठेवलीस तर लोक नशीब काढलंस म्हंतेली ..... अशा ठेवलेल्या कैक बायांच्या पायांत लक्ष्मी असती म्हंतेती." 'कैची' पृष्ठ क्र. २०

हे वर्णन पाहिले की ग्रामीण बोली भाषा असल्याने दिसून येते. म्हणून पाटलांची कथा ही ग्रामीण कथा आहे.

सारांश रूपाने आपणास असे म्हणता येईल की, पाटलांची कथा ग्रामीण परिसरात घडते आहे. शेतीप्रधान संस्कृती असल्यामुळे शेतीशी निगडीत असणारे अनेक विषयही हाताळले आहे. त्यामध्ये मग कौटुंबिक प्रश्न चित्रित होतात, कुटुंबवत्सलताही त्यामधून येते. मर्यादा न ओलांडता ग्रामीण प्रीती त्यामधून चित्रित होते. नवराबायकोमधील तणाव चित्रित होतात, लोकांच्या समजुती त्यामधून व्यक्त होतात, साप बोलतो आहे यावरती हे लोक अंध:श्रद्धेपोटी विश्वास ठेवत आहेत. सूडाची भावना या ग्रामीण भागात आहे. तीं काही कथामधून व्यक्त झालेली आहे, अनेक प्रकारच्या रूढीपरंपराही कथेमधून व्यक्त होतात, प्राणीजीवन कथेमधून आलेले आहे, भाताची कापणी, धान्याची मळणी हे विषय कथेतून व्यक्त झालेले आहेत. या सर्वांची रंगत वाढविण्यासाठी निसर्ग ग्रामीण पातळीवर चित्रित झालेला आहे. या सर्वाचा विचार करता रंगराव बापू पाटील यांची कथाही ग्रामीण आहे हे आपणास दिसते. आणि ग्रामीण कथा म्हणूनच तिचे मुल्यमापन करणे आवश्यक आहे. हे 'भोवरा' कथासंग्रह वाचल्यानंतर वाटते.

रंगराव बापू पाटील यांच्या भोवरा कथासंग्रहाच्या बाबतीत नंदा सुर्वे म्हणतात –

"रंगराव बापू पाटील यांचा 'भोवरा' हा कथासंग्रह अस्सल ग्रामीण जीवनाचा परिचय घडवून देतो. ग्रामीण जीवनाचा एक विशेष म्हणजे त्यात असणारं थेटपण. फारसे वळसे, वळण न घेता उतरल्यामुळे ते फारच मोकळं वाटायला लागतं." १

## २) मनोविश्लेषनात्मक कथा

'भोवरा' कथासंग्रहामध्ये 'कैची' ही एकच मनोविश्लेषनात्मक कथा आल्याचे दिसते. या कथेमध्ये चंदर हा एक विधवा बाई घरी आणण्याचा विचार करतो. एका संध्याकाळी तिने घेऊन जाण्यासाठी बोलावलेले असते. तो सारखा तिचा विचार करीत असतो. त्याचं चित्त थाऱ्यावर नसते. त्याचं मन सारखं बोलत असते –

" तिनं आज बुलीवलय नौका तुला?

– बुलीवलंय हे खरं, पण आपलं धाडस हुईल का?

– धाडस न हुयाला काय झालं? ....... तिनं

सांगितलेल्या येळंवर जायाचं अन् मळ्यात तिला घिऊन याचं.

– वाटतं तितकं सोपं न्हाय ...... पुरा इचार केला पायजे.

– तेही खरंच जन्माचा––––– इचार केला पायजे. " 'कैची' पृष्ठ क्र. १७,१८

एकीकडे चंदरचे मन तिच्याकडे ओढ घेते पण दुसरे मन त्याला भिती घालत असते. जर तिला घरी आणायचे म्हटले तर धाडसाचे काम आहे. सर्व जीवनाचा प्रश्न आहे पण तिला घेऊन येणं इतकी सोपी गोष्ट नाही असेही त्याला वाटत राहते.

परंतु मन सारखे तिच्याकडे ओढ घेत असते. तीने सीताफळीच्या झाडाखाली वाट बघत बसते म्हणून सांगितलेले असते. त्याच्या मनाची घालमेल सुरू होते –

"चागलं पाखरूं घावलंय बघ ....... आता

जलमभर सोडू नकं

— त्येचाच इचार करतुया ....... हे आपल्याला सांभाळायला निबंल काय?

जन्माचं भलं हुईल का वाटुंळ? ..... मानसं चांगलं म्हंतेली का थुकतेली?

— माणसासनी काय ती तशीच वरडायची." 'कैची' पृष्ठ क्र. १८

एक तर त्याला वाटते तिला आणावी, पण लोक काय म्हणतील असेही त्याला वाटत राहते. माणसे काहीही म्हणायची आपण त्याकडे लक्ष द्यायला नको असे वाटत राहते.

शेवटी चंदर हा मनाचा पक्का निर्धार करतो आणि तिला घरी आणायचा बेत आखतो. सोबत म्हणून तो रामाला घेण्याचे ठरवतो आणि जेवण घेऊन येणाऱ्या रामाची वाट बघत तो बसतो.

नंतर भाकरी घेऊन रामा येतो. भाकरी खात असताना त्याचं मन स्थिर नव्हतं. भाकरी खाऊन झाल्यावर त्याने तंबाखू भरून चिलिम ओढली. झुरके मारत असताना परत त्याला त्या बाईचे रूप नजरेसमोर दिसायला लागते.

"एकदा ती आपल्या मुसुंबीच्या बागंत आलीवती ....... तवा ती पोपटी रंगाचं पातळ नेसून आली हुती ...... हातात हिरवी काकणं हुती काजळाचं बॉट डोळ्याला पुसलवतं पिकलेल्या मुसुंबीगत पिवळाझार तिचा झंपर हुता, पान खालुवतं रागवाच्या चुचीगत व्हाट लालगलींद दिसत हुतं." 'कैची' पृष्ठ क्र. २३,२४

असे तो मनातून तिचे रूप नजरेसमोर आणतो. तो रामाला सर्व बोलून दाखवतो आणि तिला आणून मळ्यात ठेवायची असेही तो सांगतो. हे ऐकून रामा मात्र एरबाडतो, दचकतो त्याला काय बोलावे हे सूचत नाही. रामा चंदरची समजूत घालण्याचा प्रयत्न करतो. भावकी काय म्हणेल, घराला बट्टा लागेल.

"घराला डाग हाय ...... एक विधवा बाई ..... पाटलाच्या चांगल्या कुळातल्या पोरानं ठेवावी ..... हयो बट्टा हाय ..... घरादाराला बट्टा हाय ......" 'कैची' पृष्ठ क्र. २७

रामाचे हे शहाणपण चंदरला सूचले नव्हते. ताईचे लग्न करायचे आहे. चांगल्या ठिकाणी पोर पडावी असे जर तुला वाटत असेल तर तिचा विचार करू नका असेही रामा सांगतो. चंदरला आपली चूक कळते.

" चंदरचं डोकं फिरलं. कैचीत सापडल्यागत झालं. त्याचं पाय थरथरू लागलं. मातीचा ढिगारा त्याच्याभोवती फिरू लागला. काळ्यामाळ्या केल्यागत वाटू लागलं. चादण्याचा छत गरगरा फिरू लागला. त्याचा वेग वाढू लागला." 'कैची' पृष्ठ क्र. २८

असा हा चंदर कैचीत सापडतो. एकीकडे बाईवरचे प्रेम व दुसरीकडे बहिणीचे लग्न. अशी ही चंदरच्या मनाचे दर्शन घडविणारी मनोविश्लेषनात्मक कथा आहे. या कथेच्या सदर्भात नंदा सुर्वे म्हणतात –

" कैची ही कथा प्रेमळ वातावरणातली 'तिचा जीव हाय माज्यावर ..... माजाबी . ... ' असं म्हणणारा चंदर तिला ठेवण्याचा मनोदय करत असतो. बराच काळ तो स्वप्नरंजनात गुंग असतो. त्या भविष्यकाळात डोकावण्याचा खूपच खूष होऊन जातो. पण त्याचा मित्र हितचिंतक होऊन त्याच्या या खुशीपासून परावृत करतो. बहिणीच्या लग्नाची समस्या करू नकोस, असा सल्ला त्याला देतो. चंदरपुढे खरंच पेच पडतो. अखेर माणसाला कुटुंबभिमुख, समाजाभिमुख व्हावच लागतं आपल्या आवडीनिवडीवर फुल्या माराव्या लागतात." २

'कैची' कथेशिवाय इतर 'दुपार' आणि 'जोडणी' या दोन कथेमध्ये थोड्या प्रमाणात मनोविश्लेषण आलेले आहे.

दुपार कथेमध्ये चंदर हा बकुळेला आणण्यासाठी जातो तिला घेऊन परत येत असताना दुपारच्या वेळी चंदर मनातून खूप घाबरतो. कारण रस्त्याने जास्त माणसांची रहदारी नसते. आणि त्याने बापाला मारलेल्या व्यक्तीचा सूड घेतलेला असतो, त्याला मारलेले असते. आपल्या पोराची अवस्था आपल्यासारखी होईल काय, या शंकेने त्याचं मन कावरंबावरं झालेले होते.

" उनाच्या कढत वाफांनी, झळांनी तो आंबा थरथरल्यासारखा दिसत होता. वळसे घेत गेलेली भडकिंब्याची वाट थरथरत होती. आणि चंदरची छाती भितीनं वरखाली होत होती. अचानक कुंकू लावलेलं बायकोचं कपाळ त्याच्या नजरेसमोर दिसत होतं. मध्येच तिचं कपाळ कुंकू नसल्यासारखं दिसत होतं. तिचा चेहरा फटफटीत दिसत होता ...... मनात नाही नाही ते विचार येत होते आणि माळावरची वाट संपत नव्हती. ऊन संपत नव्हतं. झळा वाढतच होत्या बुबळांना जाणवत होत्या." 'दुपार' पृष्ठ क्र. ४४

या वर्णनावरून असे दिसते चंदरच्या मनामध्ये खूप भिती निर्माण झालेली आहे. त्याला नको नको ते विचार मनात येत आहेत. तसेच त्या आंब्याखाली त्याने खून केला त्या आंब्याकडे पाहून तो जास्तच घाबरतो. अशा घाबरलेल्या चंदरच्या मनाचे दर्शन आपणास 'दुपार' कथेमध्ये घडते.

'जोडणी' कथेमध्ये दत्तू माळी याचे भाताचे पीक काढायला आलेले असते. पावसाची लक्षणे दिसत असतात. उगीचच त्याला आभाळ गडगडल्याचा आवाज येतो.

"कुठलं आभाळ वाजलं! झोपा उगंच, आभाळात ढगाचा ठिप्पूस न्हाय न् कुठलं आलं आभाळ तुमाला? पण त्याला काय ते खरं वाटायचं न्हाय. तो उठून अंगणात यायचा काळ्यामाळ्या घुंगूरमाळ्या केल्यागत आभाळात बघायचा. डोळं फाडून बघायचा. निळंभोर आभाळ

चांदण्याचा सडा शिंपून खदखदा हसत असलेलं दिसायचं, आणि त्याला उगंचंच खुळ्यात निघाल्यागत वाटायच. पुन्हा त्याचा डुलका लागतोय न लागतोय तोच बेल बडिवल्यावाणी पुन्हा आभाळ गरजल्यागत वाटायचं. पुन्हा तो डोळ्यावरनं पाघरून काढायचा बाहेर यायचा आभाळात चांदण्या लुकलुकतेल्या बघून झोपायचा." 'जोडणी पृष्ठ क्र. ११०

यातून दत्तूमाळी याची मन:स्थिती आपल्या लक्षात येते. भाताचे पीक पदरात पडावे असे त्याला वाटत असते. त्या विचाराने त्याला सारखी पावसाची चिन्हे दिसत असतात आणि मनातून तो खूप घाबरलेला असतो, अस्वस्थ होतो.

सारांशरूपाने आपणाला असे म्हणता येईल की, विधवा स्त्रीला घरी आणून ठेवण्याचा विचार करणारे चंदरचे मन तसेच भावकी आणि बहिण यांच्यापायी त्याने मनात घातलेली आवर हे 'कैची' कथेमधून दिसते. तर खून केल्यामुळे त्याचा बदला कोण घेईल की काय या विचाराने घाबरलेले मन 'दुपार' कथेमधून चंदरचे दिसते. तसेच भाताचे पीक पदरात पडावे म्हणून सतत विचार करणारा आणि पाऊस येईल म्हणून आभाळाकडे पाहणारा दत्तू माळी याचे मनोदर्शन 'जोडणी' कथेमधून प्रत्ययास येते.

## ३) विषयांची विविधता

'भोवरा' कथासंग्रहामधून रंगराव बापू पाटील यांनी विविध विषय हाताळलेले आहेत त्यामध्ये त्यांनी छोट्या मोठ्या घटनाप्रसंगावरही कथानिर्मिती केली आहे. 'भोवरा' कथासंग्रहामधून हाताळलेले विविध विषय खालीलप्रमाणे –

## १) लोकसमजूतीवर आधारीत कथा

'भोवरा' कथासंग्रहामध्ये 'भोवरा' या शीर्षकाचीच लोकसमजुतीवर आधारीत अशी कथा आहे. चंदर पैलवान हा नवीन पाडं खरसुंडीसिद्धास्नं आणतो. संध्याकाळी त्याच्या वाड्यापुढं पाडं बघायला माणसं गोळा होतात. प्रत्येकजण आपआपल्या परीनं पाड्याचे निरीक्षण करतो. दुसऱ्या दिवशी दिवस उगवायला गाडी जुंपली जाते. गाडीचा खडखडाट ऐकून रस्त्यावरची माणसे बाजूला पळतात. या पाड्याचा पाठीवरती भोवरा असतो. असले जनावर खूप खोडकर असते असा लोकांचा समज असतो त्याप्रमाणे घडतेही. कारण ज्यावेळी गाडी जुंपली जाते त्यावेळी गाडी वाट सोडते आणि नको तिकडे धावू लागते. दत्तू आबाचा फेटा बाजूला पडतो सदावाणी चांगला सूबकतो. बघता बघता गाडी सुटते व दोन बैलांची झूंज सुरू होते. शेवटी कशीतरी बैलांची दावी धरून झूंज आवरली जाते.

चंदरचा असा समज होतो की, बैलाच्या पाठीवर भोवरा असल्यामुळेच हे सर्व घडले आहे. त्याला सर्व लोकही बैल खोडकर आहे, याबद्दल बोलतात त्यामुळे चंदर त्या पाड्याला विकण्याचे ठरवतो. परंतु तीनशे रूपयाची तूट सहन करून देखील त्या पाड्याला कोणीही देण्याचे कबूल करत नाही.

जनावराच्या पाठीवर असलेला भोवरा आणि लोकांच्या समजूती या विषयाभोवती ही कथा फिरते. शेवटी चंदरला विचारमग्न अवस्थेत सोडून ही कथा संपते. अशी ही लोकसमजूतीवर आधारीत कथा आहे.

## २) मनोविश्लेषणात्मक कथा

'भोवरा' कथासंग्रहामध्ये 'कैची' ही मनोविश्लेषणात्मक कथा आलेली आहे. या कथेमध्ये चंदर हा एक विधवा स्त्री घरी आणण्याचा विचार करतो. तिला मळयात ठेवण्याचे ठरवतो. पण त्याला रामा सांगतो तुमच्या बहिणीचे लग्न व्हायचे आहे, जर तुम्ही असे केले तर कुळाला बट्टा आहे, भावकी नावे ठेवील त्यावेळी हे सर्व चंदरला पटते. पण एकीकडे त्या बाईवरचे प्रेम व दुसरीकडे बहिणीच्या लग्नाचा प्रश्न या दोन्ही मध्ये तो कैचीमध्ये सापडतो. त्याला आपल्या मनाचे सर्व खेळ थांबवावे लागतात. इच्छा असतानासुद्धा तो तिच्याशी लग्न करू शकत नाही. अशी ही चंदरच्या मनाचे खेळ व्यक्त करणारी मनोविश्लेषणात्मक कथा आहे.

## ३) संघर्ष कथा

संघर्ष कथेमध्ये 'भोवरा' कथासंग्रहामधील 'लूट' आणि 'माघारीण' या दोन कथांचा समाविष्ठ करता येईल. 'लूट' कथेचा नायक कोंड्या हा तमाशातली सगुणा नावाची स्त्री काढून आणून घरी ठेवतो. घरी त्याची जाड बायको असते ती त्याला आवडत नाही नंतर एक दिवस कोंड्याचा मित्र तुका हा बातमी घेऊन येतो. तुझ्या सगुणाला पळवून नेणार आहेत त्यावेळी मदतीसाठी कोंड्या हा तुकाला बोलावतो. दोघेजण दगडांचा ढीग करून गोफण घेऊन बसतात. विरोधकांना कसं थोपवायचं हा प्रश्न त्याच्यापुढे होता. त्यानं दोघी बायकांना आतून दार घट्ट लावायला सांगितले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. घुसखोरांनी मारामारी करून अखेर तिला पळवलीच. कोंड्या नाराज पण तेवढ्यातच कणगीत लावलेली सगुणा पुढे आली आणि म्हणाली, "आवं मीच समजून माझ्या सवतीला त्यांनी पळवून नेली नौकां." "कोंड्यांची जाडगेली काळी बायको ही त्या हल्लेखोरांची "लूट" उरली आणि याची ही "लूट".

अशी ही संघर्ष कथा आहे त्यामध्ये अगदी सार्थपणे पाटलांनी संघर्ष टिपलेला आहे.

तर 'माघारीण' कथेमध्ये 'बाबू' हा चांगली करणी करून आणण्यासाठी बायकोला खूप दिवस माहेरी ठेवतो. नंतर तो तिला घरी आणतो. ती घरी आल्यानंतर सावत्र सासूच्या पाया पडत नाही. हे पाहून बाबू चिडतो. पाहुण्यांना व बायकोला नको–नको ते बोलतो. विष्णू बाबूला समजून सांगून शांत करतो. नंतर सगळयांनाच आपली–आपली चूक समजते. बाबूची बायको चुकले म्हणून सासूच्या पाया पडते. आणि संघर्षमय असणारी कथा संपते. अशी कौटुंबिक संघर्ष व्यक्त करणारी ही कथा आहे. हा संघर्ष व्यक्त करताना पाटील लिहितात –

"असू दे बाबू ! पाया पडलं न्हाय म्हणून काय हुतंय?

आणि बायकोजवळ जास्त आवाज चढवून बाबू म्हणाला

'पण पाया पडलं म्हणून हिच्या का बाची पदरमोड हुतिया?'

'मी न्हाय पाया पडायची '

'चाबकानं बडीवल्याची आटवण न्हाय वाटतं! न्हाय चार दिस न्हायलीस माहेरात तंवर गुर्मी चढली अंगात ?'

व्हय चढलीया ! " 'माघारीण' पृष्ठ क्र. ९७

## ४) अंधश्रद्धेवर आधारीत कथा

'फणा' ही अंधश्रद्धेवर आधारीत कथा आहे. या कथेमध्ये वैरणीला गेलेला किसन वैरण न घेताच परत येतो. अंगातनं वारं गेल्यागत तो जोत्यावर बसतो. रानात बांधाला त्याने साप पाहिलेला असतो. त्याची भीती त्याला वाटत असते. त्याला साप अडवतो. फणा काढून ठिसकारतो. त्यावेळी कुपावरून उडी मारून किसन घरी येतो. थड्याला नैवेद्य ठेवला नाही म्हणून साप दिसला असा समज करतात. म्हातारी देवाला कौल लावते किसनला पूर्वीचे काही प्रसंग आठवतात. एकदा त्याने बबीचा हात धरला होता. तसेच आपण बुवामहाराजांची चेष्टा केली होती. लोकांनी त्याला खुळ्यात काढलेले होते. त्यावेळी 'तुला सहा महिन्याच्या आत कळेल' असा बुवाने शाप दिला होता. हे सर्व आता खरे होत आहे असे किसनला वाटते. सारखा साप दिसतो आहे म्हणून आपण बबीचा हात धरला होता. अशी कबुली किसन बायकोजवळ देतो. त्यावेळी त्याची बायकोही फणा काढून उभी रहाते आणि म्हणते –

"तूमी तिचा हात धरालासा? बबीचा? मी हुते नौका? का मेलेवते? व्हय ...... मी हुते नौका?" 'फणा' पृष्ट क्र. ४०

हे ऐकून सापाच्या फण्यापेक्षा बायकोचा फणा किसनला अधिक असहय् होतो. अशी ही कथा आहे. भीती दाखवतो डुक धरतो. अशा प्रकारच्या अंधःश्रद्धाही कथेतून येतात.

## ५) विनोदी कथा

'भोवरा' कथासंग्रहामध्ये 'चैनी' ही विनोदी कथा आलेली आहे. भात भांगलायला असलेली माणसे चैनी करायचे ठरवतात. त्यासाठी भराभर भात बडवून मटण आणण्याठी दोघांना इस्लामपूरला पाठवितात. बरोबर दोन बाटल्याही आणल्या जातात. म्हादा हा सर्वांना दारू पाजतो व आपण फक्त प्याल्याचे सोंग करतो. दारू पिल्यामुळे प्रत्येकजण झोकांड्या खातो. प्रत्येकाची मजा म्हादा बघतो.

काम करताना सर्वजण म्हादाला त्रास देत होते. त्यांची मजा म्हादा करतो. तो हरिबाच्या हातात चाबूक देतो. आणि त्याला सांगतो गाडी सरळ चालव. त्यावेळी हरीबा दारू पिलेल्या प्रत्येकाला चाबकाने ठोकून काढतो.

नंतर म्हादा पानाचा विडा करतो. आणि सर्वाच्या अंगावर पिचकारी मारण्यास सुरूवात करतो. सर्व दारू प्याल्यामुळे पाऊस पडतोय वगैरे बोलायला लागतात. म्हादाला मात्र मजा वाटते. हे वर्णन करताना पाटील लिहितात —

"म्हादानं मणेर पुडीतील काळीभंगार तंबाखू तळहातात घेतली, त्यात चुना कालीवला तंबाखू चांगली मळली आणि तोंडात टाकली. तोंडात चांगला रस होऊन दिला आणि मग म्हादा गाडीतनं उठला. खाली आला. दोन बोटं व्हटाला लावून त्यानं लालभडक पिचकारी ब्रोबर मोक्याच्या अंगावर हाणली. पालथा झोपलेला मोक्या उत्ताणा होत बोलला.

"आयला ह्या पावसाच्या! काय थेंब म्हणायचा का काय! म्हादा पुन्हा धोतर सावरून गाडीत चढला. बावकाडावर बसून उगीच पान चघळीत राहिला. पुन्हा तोंडात चांगला भरपूर रस होवू दिला. तो तोंडात मावेनातसा तो उठला. आणि गाडीतनंच जोराची पिचकारी हाणून एका पिचकारीत तीन गडी भरवलं. " 'चैनी' पृष्ठ क्र. ६५

शेवटी म्हादा गाडीत झोपतो. सकाळी सकाळी सगळेजण बघतात. प्रत्येकाचे शर्ट लाला झाले होते. ते म्हादावर चिडतात, पण म्हादा त्यांना सांगतो. तुमची दारू पिऊन अशी अवस्था झाली. ऐकमेकांच्या अंगावर थुंकण्याची शर्यत लावली होती.

प्रत्येकाला चैन चांगलीच महागाईत पडते. म्हादा एक रूपाया दत्तूमामाच्या हातात ठेवतो व सांगतो. मालक यायच्या आत साबण आणून कपडे धूवा,अशीही विनोदी कथा आहे.

## ६) विवाह कथा

विवाह कथेमध्ये 'भोवरा' कथासंग्रहामधील 'पाहुणा' या कथेचा समावेश करता येईल. यो कथेमध्ये बाळासाब येतो. मामाच्या घरी त्याला लपवले जाते. पण नंतर बाळासाबच्या घरचे लोक व मामा यांच्यात काहीतरी बोलणे होते. मामा युक्ती काढतो पांडाला सांगून बाळासाबाला मारूतीच्या देऊळाजवळ आणतात. मामाही येतात. बाळासाबाच्या भाऊकीतले सर्व लोक बोलवले जातात. बाळासाब चकीत होतो, समोर पाहतो तो मामाची हिरवा चुडा भरलेली काळीकुट्ठ पोरगी समोरच्या पाठावर उभी असते. तांदूळ पडून टाळ्यांचा गजर होतो तरी बाळासाब भिरमाटल्या उभाच असतो.

आश्रयासाठी आलेल्या बाळासाबाच्या गळ्यात मामाची काळीकुट्ठ पोरगी पडते. अशी ही विवाह कथा आहे.

## ७) सूडकथा

'भोवरा' कथासंग्रहामधील 'दुपार' ही सूडकथा आहे. दुपारच्यावेळी बकुळा आणि चंदर हे दोघेजण आपल्या भडकंबी गावी येत असतात. चंदरला मनातून खूप भीती वाटत असते. कुणीतरी आपणावर हल्ला केला असे त्याला वाटत असते. वाटेने चालताना बकुळा नको तो विषय काढते. मामंजींना याच आंब्याखाली मारले का? असे ती विचारते चंदरने मात्र वडिलांचा ज्या माणसाने खून केला त्याला कधीच मारलेले असते. हे मात्र बकुळाला माहीत नसते. त्यामुळे आता आपल्यावर कोणीतरी सूड उगवेल असे चंदरला वाटते. म्हणून तो खुप अस्वस्थ असतो. चालताना थोडीही खुस–खुस झाली तरी तो घाबरत असतो. ज्या घराण्याशी चंदरचे वैर असते त्यांच्याच पाहूण्याच्या गाडीतून चंदर आणि बकुळा घरी येतात अशी ही सूडकथा आहे.

## ८) निसर्गवर्णनपर कथा

'भोवरा' कथासंग्रहामध्ये 'जोडणी' ही निसर्गवर्णनपर कथा आहे. दत्तू माळ्याचा भात काढायला आलेला असतो. पाउस पडेल की काय याची भिती त्याला वाटत असते. पाउस पडला तर आलेला भात जाईल असे त्याला वाटते. भाताचे पिक चांगले आले होते. हे सांगताना पाटील लिहितात –

"हेंदा भात बेजम पिकलं होतं हे त्यालाही पटत होतं असं या गेल्या वर्सात पीक तरारून आलं न्हवतं. चांगल कंबरपेक्षा उंच येवून तवऱ्याच्या वझ्यान वाकलं होतं. आणि वाऱ्यावर सुगंध फेकीत होतं. एखादा भुजंगाचा सुगंध सबंध शिवारात दरवळावा तस दरवळत होतं. इशीक गाडी शेणखत वतल्याल्याच हे सोनं आल होतं ...... हेंदा दोन तिन हजाराला मरान न्हवतं. किच्चाबी खावा भात ...... " 'जोडणी' पृष्ठ क्र. १०५

एकंदर 'भोवरा' कथासंग्रहामधून पाटील यांनी असे विविध विषय हाताळलेले आहेत. त्या कथेमध्ये कधी विनोद आहे, कधी अंधश्रद्धा आहे. कधी चैनी व्यक्त झालेली आहे. काही कथामधून लोकसमजूती आहेत. काही कथा शेतीनिष्ठ आहेत. काही सूडानी भावना व्यक्त करणाऱ्या आहेत.

## ४) स्वभावरेखाटन

रंगराव बापू पाटील यांनी 'भोवरा' या कथासंग्रहामध्ये वेगवेगळया व्यक्तिरेखा रेखाटलेल्या आहेत. त्यामध्ये विधवा स्त्री घरात आणू इच्छिणारा चंदर आहे. बैल विकत घेणारा चंदर आहे. सुगंधावर प्रेम करणारा आंदू आहे. लग्नाला घाबरणारा बाळासाब आहे. तमाशातली सगुणा नावाची स्त्री पळवून आणणारा कोंडया आहे. चैनी करणारा आणि सर्वांना दारू पाजून मजा बघणारा म्हादा आहे. सापाला घाबरणारा किसन आहे. कष्ठ करणाऱ्या स्त्रिया आहेत. शेतात कष्ट करणारी गडीमाणसे आहेत. ग्रामीण परिसरातील सुशिक्षित आणि अशिक्षित अशा दोन्हीही व्यक्तिरेखा आहेत अशा वेगवेगळया व्यक्तिरेखांनी त्यांच्या चितरकथांनी, प्रीतीत गुरफटलेल्या मनांनी रंगराव बापू पाटील यांची कथा त्यांच्या स्वभाववैशिष्टयांसह गजबजलेली आहे.

## १) प्रीतीविश्वात रमणारी पात्रे

पात्रांच्यामध्ये खालील पात्रांचा समावेश करता येईल.

### १) चंदर

चंदर हा 'कैची' कथेमधून आलेला आहे. तो एका विधवा बाईवरती प्रेम करतो आणि तिला आणून मळ्यात ठेवण्याचा विचार करतो आहे. तो पाटील घराण्यातला आहे. पान खाण्याची त्याला सवय आहे. त्या स्त्रीने त्याला घेऊन जाण्यासाठी बोलावलेले असते. तिच्या घराच्याबाहेर सीताफळीच्या झाडाखाली थांबते म्हणून तिने सांगितलेले असते. मनातून घाबरट असणाऱ्या या चंदरच्या मनात विचारांची अनेक वादळे उठायला लागतात. तो अस्वस्थ होतो.

बाईशिवाय त्याला काही सूचत नाही. शेवटी तो धाडस करून रामाला सर्व सांगतो आणि त्याला सोबत म्हणून येणार का? असे विचारतो. त्यावेळी त्याला रामा समजून सांगतो. तुम्ही जर तिच्याबरोबर लग्न केले. तिला घरी आणून ठेवलं तर कुळाला बट्टा लागेल. ताईसाबांचे लग्न व्हायचे नाही. हे ऐकून चंदरचे डोक ठिकाणावर येते. पण एकीकडे तिच्यावरचे प्रेम आणि दुसरीकडे बहिणीचे लग्न या दोन्हीमध्ये चंदर सापडतो. त्याच्या मनाची झालेली अवस्था त्यामुळे चंदर मनात राहतो. इच्छा असतानाही त्याला काही करता येत नाही ही खंत मनात राहून जाते. एकंदर चंदरचे मन प्रेमाच्या विश्वात गुंतलेले दिसून येते.

## २) **कोंड्या**

करड्या आवाजाचा कोंड्या हा 'लूट' कथेमधून चित्रित झाला आहे. तो तमाशातील सगुणा नावाच्या स्त्रीवर प्रेम करतो आहे. आणि तो तिला घेऊन घरी येतो आहे. ती सगुणा सुंदर असल्यामुळे तिच्यावर सर्वांचा डोळा आहे. त्यासाठी तिला पळवून नेण्याचा विचार सर्वांचा चाललेला असतो. कोंड्याची ती जाड बायको असते ती त्याला आवडत नाही. त्याचा जीव सगुणेवरती जडलेला असतो. आणि होतेही तसेच सगुणाला पळवून नेण्यासाठी आलेले लोक सगुना समजून त्याच्या बायकोलाच पळवतात आणि ती सगुणा कोंड्याचीच होऊण राहते. असा हा कोंड्या आहे. तमाशातली बाईसुद्धा काढून आणायला मागेपुढे पाहत नाही. तसा तो धाडसी मनोवृतीचा आहे. तुक्याला बरोबर घेऊन तो कुऱ्हाडीला धार लावून, सगुणाना पळवून नेण्यासाठी आलेल्या लोकांना प्रतिकार करतो आहे. त्यामुळे तो मनावरती ठसतो.

## ३) **आंदू**

हा 'जोडणी' कथेमधून येतो. तो सुगंधीवर प्रेम करतो आहे. शेतात गेला की तो लवकर घरी येत नव्हता. त्याला उशीर झाल्याचं त्याला कळत नव्हतं. कशाचेही त्याला शुभअशुभ वाटत नाही. सकाळी दुध प्यायचे बारा एकला जेवायचे आणि गावातून फिरायचे असा हा आंदू होता. तो सुगंधीबरोबर एका रात्रीत सर्व भात कापून टाकतो. सकाळी उठून गेलेल्या दत्तू माळयाला आश्चर्य वाटते. सगुंधावर आंदूचा जीव आहे.

## २) सूडाने पेटलेल्या व्यक्तिरेखा

यामध्ये 'दूपार' कथेतील चंदरचा समावेश करता येईल. चंदर हा वडिलांच्या मायेला पोरका झालेला आहे. मनानं घाबरट परंतु वडिलांच्या खुनाचा बदला घेतल्यामुळे तो खुनी असतो. 'मामंजीचा खून झाला तवा तुमी किती वरसाचं हुता' या बायकोच्या प्रश्नाने तो चमकतो. त्याच्या मनातील वडिलाविषयीची माया जागृत होते. आपल्या मुलाचीही अवस्था आपल्यासारखीच होईल म्हणून त्याचे मन कावरेबावरे झालेले असते. खूनाला वाचा तो बायकोजवळ फोडतो. आणि वडिलांना मारलेल्या व्यक्तीचा तो कधीच खून केलाय असे तो सांगतो. त्याला खून केलेल्या समाधानापेक्षा केवळ समाधान आहे ते फक्त सूड घेतल्याचे.

चंदरच्या पात्राच्या बाबतीत प्रा. वि.रा.तोडकर म्हणतात –

"तसा हा चंदर खुनी पण तरीही त्याच्या विषयी किळस वाटू नये, वाटत नाही. डावाला डाव दिला असला तरी तो काही सराईत निर्ढावलेला खुनी नव्हे." [३] राजाराम कॉलेज कोल्हापूर 'कमल' वाङ्‌मय चर्चा मंडळात झालेल्या चर्चेतील मत, असा हा चंदर आपल्या मनात राहून जातो.

## ३) शेतीजीवनाशी एक निष्ठ व्यक्तिरेखा

### १) दत्तू माळी

दत्तू माळी हा शेतावर खूप प्रेम करतो. 'जोडणी' कथेमधून तो चित्रित होतो. मुलगा आळशी आहे याचा त्याला राग आहे. कुत्र्यावर त्याचा जीव आहे. पण काढाय आलेला भात आपल्या पदरात पडतोय की नाही याची भिती त्याला आहे. कारण आभाळ सारखं येत होतं. पावसाची चिन्हे दिसत होती. त्याला झोप लागत नव्हती असा शेतावर प्रेम करणारा आणि शेतीशी एकनिष्ठ असणारा दत्तू माळी आपल्या लेखनीने पाटलांनी चितारलेला आहे.

## ३) चंदर

हा पहिलाच 'भोवरा' कथेत आला आहे त्याला जनावरांबद्दल आकर्षण आहे. म्हणून तो खरसुंडीसिद्धास्नं बैलाचं एक पाडं विकत आणतो. तो पैलवान असतो रस्त्यानं येणारी जाणारी माणसं नवीन आणलेला बैल बघण्यासाठी जमतात. परंतु या बैलाच्या पाठीवर भोवरा असतो, असलं जनावर खूप खोडकर असते. असे लोक चंदरला सांगतात आणि घडतेही तसेच गाडी जुंपल्यानंतर बैल उधळतात आणि दोन बैलांची झुंज लागते. शेवटी कसेतरी दोन्ही बैलांना आवरले जाते.

चंदर वैतागतो आणि तो तीनशे रूपयाचा तोटा करून बैल विकण्याचे ठरवतो. पण पाठीवर भोवरा असल्यामुळे कोणीही घ्यायला तयार होत नाही. चंदरला तोटा सहन करावा लागतो. हा चंदर वाचकांच्या चांगलाच लक्षात राहतो.

## ४) कैचीत सापडलेली व्यक्तिरेखा

### बाळासाब

'पाहुणा' कथेत ही व्यक्तिरेखा येते. बाळासाब मामाच्या घरी पळून येतो. त्याला लग्न करायचे नसते. तसे लग्न न करण्यापाठीमागे काहीच कारण नसते पण नंतर मामा युक्ती करतो. आणि त्याच्या गळयात काळी पोरगी बांधतो. असा हा बाळासाब आहे.

## ५) घाबरट व्यक्तिरेखा

### किसन

घाबरट व्यक्तिरेखामध्ये 'फणा' कथेतील किसनचा समावेश येईल. हा अंधःश्रद्धेलाही बळी पडलेला आहे. तो एक दिवस वैरणीला जातो आणि वैरण न घेताच परत येतो. त्याला रानात साप दिसतो. त्याच्यावर तो साप ठिसकारतो. थड्याला नैवेद्य ठेवला नाही म्हणून साप दिसला असा समज होतो. त्याचे मन त्याला खात असते त्याने एकदा बबीचा हात धरलेला

असतो. तसेच बुवामहाराची चेष्टा केलेली असते. त्यामुळे आपणाला साप भीती दाखवतो आहे

असे किसनला वाटते. किसनला भीतीमुळे अंगातनं वारं गेल्यासारखे वाटते. शेवटी तो बबीचा हात धरलेल्याची कबुली बायकोजवळ देतो आणि त्यावेळी बायको जो फडा काढते तो फणा त्याला सापाच्या फणापेक्षा असह्य वाटतो. असा हा अंधःश्रद्धेला बळी पडलेला किसन आपणास दिसतो.

## ६) विनोदी व्यक्तिरेखा

### म्हादू

हा विनोदी व्यक्तिरेखा म्हणून चित्रित होतो. तो चैनी कथेत आला आहे. भात भांगलायला आलेली माणसे मटन आणून चैन करायचे ठरवतात. म्हादू मुख्य असतो तो सर्वाना दारू पाजतो. तो हरिबाच्या हातात चाबूक देतो आणि गाडी सरळ चालव म्हणून सर्वांना मारायला लावतो. नंतर तो पान खाऊन सर्वांच्या अंगावर थुंकतो. सर्वजण दारू पिल्यामुळे त्यांना वाटते आपल्या अंगावर पाऊस पडतो आहे. हे विनोदी वर्णन करताना पाटील लिहितात –

"हाऱ्या गाडी हाणकी सवंनं, 'म्हादा.

' काय? .... मी गाडीत हाय?

'नीट गाडी हाण धुन्याव घालशील' तसं हरिबानं डोळं चोळलं, चाबूक चापून धरला आणि समोर पांढऱ्या दिसणाऱ्या आकृतीवर जोरानं ओढला. तो मोकळ्या अंगावर चापकन वाजला." 'चैनी' पृष्ठ क्र. ६३,६४

असा हा म्हादू सर्वांची मजा बघतो. सर्वांची फजिती करतो. विनोदी व्यक्तिरेखा म्हणून तो मनात राहतो.

## ७) स्त्री व्यक्तिरेखा

### १) तमाशातली सगुणा

सगुणा ही तमाशात काम करत असते. पेटी वाजवता वाजवता चंदर तिच्यावर भुलतो. 'लूट' कथेमध्ये ती आलेली आहे. कोंड्या तिला पळवून आणतो. तिला राजाराणीचा संसार पाहिजे होता. ती सुंदर असते नाजूक असते. तिला परत पळवून नेण्यासाठी सर्व लोक येतात. त्यावेळी चानाक्ष सगुणा कणगीत लपून बसते. त्यावेळी कोंड्याच्या काळ्या जाड बायकोलाच सगुणा म्हणून लोक पळवून नेतात. आणि सगुणा कोंड्याचीच होऊन जाते. अशी सगुणा तमाशात काम करत असली तरी स्वत:चा संसार असावा असे तिला वाटते. नंतर कोंड्याबरोबर पळून येते. तिला पान खाण्यास आवडते आहे. डोळ्यात ती काजळ घालते आहे. दोन वेण्या ती घालते आहे. अशी ही सगुणा नाची असूनसुद्धा आपल्या मनात राहते.

## २) सुगंधा

ही 'जोडणी' कथेमधून चित्रित झालेली आहे. आंदूला भात काढण्यासाठी मदत करते आहे. आंदूचा तिच्यावर जीव असतो. ती दारू काढण्याचे काम करत असते. कष्टाळू अशी ही सुगंधा आहे. तिचे व्यक्तिमत्व आपल्याला दिसते.

## ३) बकुळा

ग्रामीण स्त्रीचं प्रतीक म्हणून ही बकुळा 'दुपार' कथेमधून चित्रित होते. खूनाच्या गप्पातही ती घाबरून जात नाही. शत्रूचा मुडदा कुठं आणि कसा पाडा हे देखील नवऱ्याला ती धाडसाने सांगते आहे. चंदरच्या हळव्या मनाची तिला कल्पना आहे. "परमेश्वर पाठीवर आहे आपल्या" म्हणून नवऱ्याला धीर देणारी, नवऱ्याला नको असलेला विषय ती काढते. त्यावेळी चंदरच्या मनावरचा ताण अधिक वाढतो. स्त्रीसुलभ भितीही तिच्या मनावर आहे. नवऱ्याला ती रस्त्याने चालताना धीर देण्याचा प्रयत्न करते आहे. अशी धाडसी पण स्त्रीसुलभ स्वभाव धर्माप्रमाणे भितीही तिच्या मनामध्ये आहे तिच्या कडेवर लहान मूल आहे. पतीशी एकनिष्ठ अशी ही बकुळा आहे.

वरील वेगवेगळया वैशिष्ट्यांनी या कथा नटलेल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या माध्यमातून त्यांच्या मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न पाटलांनी केला आहे. ही पात्रे आपआपल्या वैशिष्ट्यांनी नटल्यामुळे आपल्या नजरेत भरतात आणि मनात राहतात.

वरील ठळक पात्रांच्या व्यतिरिक्त गौणपात्रांच्यामध्ये पुढील पात्रांची यादी आपणास देता येईल. ही पात्रे वेगवेगळ्या स्थरातून आलेली आहेत त्यामध्ये स्त्रीपुरूष पात्रांचाही समावेश आहे.

## गौण पात्रे

रंगराव बापू पाटील यांच्या कथेत मुख्य पात्राशिवाय इतर अनेक गौणपात्रेही येतात. काही वेळेला मुख्यपात्राइतकीच ही गौण पात्रे लक्षात राहतात. कथेला पूर्णत्व येण्यासाठी ही गौणपात्रे आवश्यक आहेत. ती ओघानेच येतात. अशी काही गौण पात्रे पुढीलप्रमाणे आहेत.

'भोवरा' कथेमध्ये 'सुभान्या' आलेला आहे. तो सुभान्या चंदरचा जानी दोस्त आहे. चंदर पाडं घेऊन आल्यानंतर तो चौकशी करतो आहे चंदरला तो आठवण करून देतो आहे. बैलाच्या पाठीवर भोवरा आहे. त्यामुळे असलं जनावर खूप खोडकर असते असे सांगून चंदरला सावध करणारा असा हा सुभान्या आहे.

कथेत आलेले आबा चंदरचे वडील आहेत. चंदरने बैल विकत आणला आहे हे त्यांना आवडलेले नाही. त्याने म्हातारा बैल विकला होता हे आबाला आवडलेले नव्हते. तो चिडला होता तो चिडून म्हणतो –

'आता आमचा बाजार करा आणि व्हा मोकळं!' असा हा कष्टाळू आबा आहे. तो वृध्द झाला असला तरी रानातून वैरण आणतो आहे राबतो आहे. राबून म्हाताऱ्या झालेल्या बैलावर प्रेम करतो आहे.

'भोवरा' कथेमध्ये सदावाणी येतो. त्याला गाडीत बसण्यासाठी चंदर बोलावतो आहे. त्यावेळी 'हवामें उडता जाये' ही गाण्याची ओळ गुणगुणत तो येतो. शेवटी गाडी जोरात पळाल्यामुळे सदावाणी चांगलाच सुबकतो. त्याचे तोंड फुपाटयाने भरते तो शेवटी म्हणतो –

'आयला! उगंचच्या उगंच गाडीत बसलो.' असा हा सदावाणी आहे.

कोन्या म्हार ही या कथेमध्ये आलेला आहे त्याचबरोबर ज्यावेळी बैलांची झुंज संपते त्यावेळी तो सगळ्यात पुढे असतो. सगळी लोकांची गर्दी नंतर कमी होते.

ज्ञानू दलाल याने चंदरला बैल घेण्यास मदत केलेली असते. तो भोवरा असलेला बैल चंदरला घेऊन देतो पण नंतर तोच बैल तीनशे रूपयाचा तोटा करूनही तो दलाल घेण्यास तयार होत नाही. असा हा फसवेगिरी करणारा दलाल आहे. तसेच कथेत गजवंत पाटील हे केवळ नाममात्र येतात.

'कैची' कथेमधील रामा हा चंदरचा गडी आहे. तो भाकरी घेऊन मळ्यावर येतो. त्यावेळी चंदर मनातले विचार त्याच्याजवळ बोलून दाखवतो आणि त्या बाईला पळवून आणण्यासाठी तू मदत कर असेही तो रामाला सांगतो. पण चंदरला या विचारापासून परावृत करतो रामा म्हणतो –

'ह्यो डाग हाय तुमाला.' जर ह्यो बट्टा लागला ....... भावानं बाई ठेवलिया समजलं तर ...... त्या कुळीतलं तुमी ..... ह्यो डाग बघून माणूस तरी यील का? .... मग पोरीचं कल्याण कसं हुयाचं? ....... सद्या माणूस मुळी–ढाळी बघतंय ...... चौकशी करतयं ........ तवा सोयरीक जमीवतंय ...... कुठं खुसपाट निघालं तर माणूस भुजतंय. ताई साबासाठी एवढं करा ..... पाटच्या भनीसाठी ...... तिचं सुख बघा ....... तुमचं नका .....' 'कैची' पृष्ठ क्र.२८

असा हा रामा वाट चुकणाऱ्या चंदरला वळणावर आणण्याचा प्रयत्न करतो आहे. सामाजिक नीतीमूल्याची त्याला जाणीव आहे. तो गडी असूनही तो मालकाला वेळीच सावरण्याचा प्रयत्न करतो आहे.

बाळू हा चंदर सारखाच मळ्यात वस्तीला जातो आहे त्याच्या आवाजानं कुत्रं भुंकल्यानंतर 'कोण आहे'? म्हणून चंदर विचारतो आहे. त्यावेळी थोडा वेळ चंदरकडे थांबून नंतर वस्तीवर जातो आहे. कथेमध्ये बाळूशाही आलेला आहे.

'फणा' कथेमध्ये किसनची बायको आलेली आहे. आपला नवरा रानातून घाबरुन आल्यानंतर ती त्याची चौकशी करते आहे. 'बोला की तरी' म्हणून त्याला विचारले आहे. साप दिसल्याचे किसन सांगतो. नंतर ज्यावेळी तिला समजते की, आपल्या नवऱ्याने एकदा बबीचा हात धरलावता तेव्हा ती फणा काढून म्हणते.

"तुमी तिचा हात धरलासा? बबीचा? मी हुते नौका? का मेलेवते? व्हय ...... मी हुते नौका? "

अशी ही किसनची बायको नवऱ्यावर प्रेम करणारी पण त्याच्या चुकीला क्षमा न करणारी अशी आहे.

'फणा' कथेत किसनची आई आलेली आहे. मुलग्याला साप दिसला याचा संबंध ती थड्याला नैवेद्य ठेवला नाही याच्याशी जोडते आहे. किसनवर तिचा जीव आहे. त्याचबरोबर देवमामा जो देवर्षी कथेमध्ये येतो, त्याची एकदा किसनने चेष्टा केलेली असते. त्याचबरोबर बबीचा किसनने हात धरला होता ती नाममात्र येते. इठूआण्णा, रांजवणे ही पात्रेही 'फणा' कथेत डोकावतात.

'दुपार' कथेमध्ये बकुळी नावाची स्त्री आली आहे. ती माहेरहून सासरी चालली असते. तिला नेण्यासाठी तिचा नवरा चंदर आलेला असतो. तिला लहान मूल असते. तिच्या पायात साखळ्या असतात. तिने नवीन लुगडे नेसलेले होते. अशी ही बकुळा नवऱ्याला नको तो प्रश्न विचारते आहे. ती म्हणजे मामंजींना कुणी मारले? या एका प्रश्नानं चंदरचे मन कावरे बावरे होते आहे.

महिपा डवंग हा याच्याशी चंदरचे वैर असते. अशी ही पात्रे चित्रित होतात.

'चैनी' कथेमधून शेतावर काम करणारे गडी चित्रित होतात. त्यामध्ये हरीबा, कमाल, लाल भाषा, सुभान्या इ. हे सारेजण कष्टकरी आहेत. त्यांच्या चैनीच्या कल्पना छोट्या आहेत.मटण व दारू ही त्यांची चैन एक दिवस प्रत्येकजण मटन खाऊन आणि दारू पिऊन चैनी करतो आणि स्वत:ची फजिती करून घेतो.

'लूट' कथेमध्ये कोंड्याला मदत करणारा तुका आलेला आहे. सगुणाला पळवून नेणार आहेत ही बातमी तो कोंड्याला सांगतो. तुका हा कोंडयाचा जवळचा मित्र आहे. असा हा तुका आहे.

'पाहुणा' कथेतील पांडा कदम हा बाळासाबच्या मामाचा मुलगा आहे. तो मोट हाकत असतो. चिवटा आाणि शेवाळेकाका हे कामाला असलेले गडी आहेत.

माघारीण कथेमध्ये 'बाबू' चित्रित झालेला आहे. बाबू हा स्वभावाने कडक आहे. करणी केली नाही म्हणून तो बायकोला खूप दिवस माहेरी ठेवतो. त्याला सावत्र आई आहे.

विष्णू भरूगडे हा बाबूचा जवळचा मित्र आहे. तो बाबूचे मन जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. तो म्हणतो –

"बायकू गेल्यापासनं हातानंच करूरन खात हुतास व्हय?

तर काय डोस्क्यानं करून खाऊ? तसा विष्णू हसला.

तसं न्हवं लेका, तू करत हुतास का पड्यालनं जेवाण करून आणत हुतास? कुणाच्यातनं?

'आईच्यातनं रं ...... आईबाच्यात भाकरी खायची न्हायस व्हय?

म्हातारा म्हातारीलाबी बरं वाटलं असतं ...... ' 'माघारीण' पृष्ठ क्र. ९२

आईचे व बाबूचे भांडण का आहे हे विष्णू भरूगडे जाणून घेतो आहे.

'जोडणी' कथेमध्ये भाऊसाब, सिद्राम ही भात काढणारी माणसे आहेत यांचा उल्लेख केवळ नाममात्र येतो.

अशा विविध रंगी स्वभावांच्या व्यक्तींनी पाटलांची कथा नटलेली आहे. त्यामध्ये स्त्रीया, पुरूष, मुलं यांचा समावेश आहे. प्रत्येकजण आपआपले वेगळे व्यक्तिमत्व घेऊन आला आहे.

म्हणून पाटलांच्या कथेच्या संदर्भात महादेव मोरे म्हणतात –

"एखाद्या घटना प्रसंगात गुरफटलेल्या व्यक्तींच्या मनाचा तळठाव घेण्याचा प्रयत्न ते प्रत्येक कथेत करत असतात. आणि इथेच ही कथा सर्वसामान्य भरड कथेहून उंच झेप घेताना दिसते." ४

मानवेतर जीवनाचे स्वभावरेखाटन –

'भोवरा' या कथासंग्रहामधून रंगराव बापू पाटील यांनी साप, बैल, कुत्रा यांचे स्वभावरेखाटन केले आहे. त्यामध्ये सापाचे वर्णन करताना पाटील म्हणतात –

“आता तेचं पिवळजरद अंग, काळाभोर धाचा आकडा आणि जिभळया चाटणारं त्वांड बघून माझं धाबं दणाणलं. ” 'फणा' पृष्ठ क्र. ३०

“चांगली वीत–दीड वीत फडी काढून राजा गुडघाभर उंच उभा होता. शेपटी सळसळत होती. सोनेरी उनात त्याची जाळीदार अंगकांती चमकत होती. काळा कुळकुळीत दहाचा आकडा दिसत होता जनावर जिभळ्या चाटीत होतं.” 'फणा' पृष्ठ क्र. ३४

“पुंगीवर डुलावा तसा राजा डुलत होता. फडी काढून थेट उभा होता. मागं आसूडागत शेपटी सळसळत होती. फडी मागं झुकवून राजा कुऱ्यात उभा होता. मधून मधून डुलत होता, ठिसकारत होता, जिभळ्या चाटीत होता, फणा वाढत होती. कमी होत होती, दोन बारीक डोळे काचेच्या मण्यागत लुकलुकत होते, फडीखाली पांढरी जाळीदार पट्टी होती आणि नागराज हिरव्याचार गवतावर सळसळ करीत होता.” 'फणा' पृष्ठ क्र. ३५

वरीलप्रमाणे सापाच्या बारीकसारीख हालचाली त्याचे वर्णन, त्याचे फणा हालवणे हे सार्थ शब्दात पाटील टिपतात.

बैलाचे स्वभावरेखाटन करताना बैलाच्या पाठीवर भोवरा असतो याविषयी सांगतात. असले जनावर खोडकर असते. भोवरा असलेला बैल चंदर विकत घेतो. तो बैल चंदरला खूप त्रास देतो. गाडी जुंपल्यानंतर दोन बैलांची झुंज लागते या बैलांच्या झुंजीचे वर्णन करताना पाटील लिहितात –

"खोडांची दावी त्यांच्या पायातनं गोळा झाली होती. सुभान्या खाली बसला. हळूहळू खोडांच्या दाव्याकडे सरकू लागला. कोशा खोडांचं दावे धराय गेला तो त्याची लाथ बसली. पायाच्या नळीवर सडक्‌न लाथ बसली तशीच तेनं कोलाटी उडी घेतली." 'भोवरा' पृष्ठ क्र. ११

तशा कोशा सार सार मागं सरला, पांढऱ्याला मग जास्तच अवसान येऊन तेनं पुन्हा कोशाच्या मागच्या फऱ्यावर शिंग हाणली. सुभान्यानं त्या गडबडीत पांढऱ्याचा सरपडत जाणारा कासरा धरला आणि खासकन मागं वडला. येसणीला जोरात वडण लागताच पांढरा बैल थांबला. चदरनं तवर कोशाची दावी धरली." 'भोवरा' पृष्ठ क्र. १२

पाटील याप्रमाणे मानवी स्वभावरेखाटनाबरोबरच मानवेतर स्वभावरेखाटन करतात

## कथांचा विकास

रंगराव बापू पाटील यांच्या कथेचा विकास हा उत्कंठा लावून ठेवणारा सूचक जाणीव व्यक्त करणारा असा आहे. ते कथांचा औत्सुक्यपूर्ण विकास करतात आणि अनपेक्षित अखेर करतात. त्यामुळे त्यांच्या कथा मनात दीर्घकाळ रेंगाळत राहतात.

### १) कथांचा आकर्षक प्रारंभ

रंगराव बापू पाटील कथेची सुरवात आकर्षक करतात. त्यामळे वाचकाला उत्कंठा लागून राहते. आणि कथेमध्ये पुढे काय आहे हे वाचण्यासाठी वाचक आतुर होतो.

'कैची' कथेचा प्रारंभी अस्वस्थ वातावरण निर्मिती केली आहे. चंदर असा का वागतो असे आपणास वाटते. मनात औत्सुक्य निर्मिती होते व आपण कथा पुढे वाचू लागतो. हा प्रारंभ करताना पाटील लिहितात –

"चंदर वाकळंच्या घडीवर एकटाच पान खात बसला होता. लाकडी माचावर त्यानं वाकळंची घडी टाकली होती आणि त्यावर तो आलकट–पालकट घालून बसला होता, त्याचं मन सारखं चलबिचल होत होतं ..... काय करावं नं काय नको हेच त्याला सूचत न्हवतं, विचार करून डोक्यात किडं पडल्यासारखं वाटत होतं, काय निश्चय होत नव्हता, मन सरड्यागत रंग बदलत होतं.

कंदील लावून त्यानं नुकताच सपरातल्या मेढीच्या खोंबाऱ्याला आडकिवला होता, त्या स्वच्छ काचेतनं अर्धा चंद्र दिसावा तशी ज्योत तेवत होती. सपरात लख्ख प्रकाश होता. पण त्याचं मन काळोखात चाचपटत होतं." 'कैची' पृष्ठ क्र. १७

पाटील 'लूट' कथेचा प्रारंभ असाच आकर्षक करतात. त्या कथेमधील कोंड्या याने तमाशातली बाई आणून ठेवलेली असते. पण तिला नेण्यासाठी इतर लोक टपलेले असतात हे सांगण्यासाठी तुका येतो. तो कोंड्या आपल्या दोन बायकांच्या आनंदात असतो. पण पुढे वेगळाच प्रकार घडतो. असा आकर्षक प्रारंभ करताना पाटील लिहितात –

"कोंड्या आढाव खोपटातून बाहेर आला आणि त्यानं लाबलचक ढेकर दिला. मग पोटावरून हात फिरवत तो अंगणात टाकलेल्या बाजल्यावर असला. धोतराच्या काठानं त्यानं तोंड पुसलं आणि तसचं घरात पाहिलं ......

कडूतेलाच्या लोखंडी दिव्यानं ते खोपाट उजळून निघालं होतं आणि त्या तांबूस प्रकाशात त्याच्या दोन बायका जेवायला बसत होत्या, त्यानं हाक दिली,

' सगुणे ! '

' काय वं ? '

' माझी चंची आण ' 'लूट' पृष्ठ क्र. ६९

हा प्रारंभ वाचल्यानंतर कथा पुढे वाचाविशी वाटते. कोंड्या किती सुखी आहे असे वाटते. त्याच्या सुखात आपणही सामील होत वाचक कथा पुढे वाचतो.

'पाहुणा' कथेचा प्रारंभही असाच आकर्षक आहे त्या कथेमध्ये पांडा कदम मोट चालवत असतो. त्यावेळी कुणीतरी पाहुणा सायकलवरून आलेला तो पाहतो. तो पाहुणा कशासाठी आलेला आहे हे वाचकास वाटत राहते. आणि कथा पुढे वाचत जातो.

"पांडा कदम मोट हाकीत असतो. बैलाचे कासरे काखेत अडकवून तो बैलांना मागे ओढीत होता. वेसणीला कसलेले बैल अंगात मेंढा आल्यागत मागे सरकत नव्हते. पांडा कदम नेट करून त्यांना मागे ओढीत होता.

मोटेचं चाक कर्कश आवाज काडीत होतं. मोट पाट भरून पाणी ओतीत होती. पाण्यातून तांबडी उंबरं, पाला येत होता, पांडा खाली बघून मोट हाकीत होता. सायकलीच्या घंटीचा आवाज आला म्हणून त्यानं वर पाहिलं.

एक पोऱ्याला पाहुणा ढेकळातनं सायकल ढकलत येत होता. अंगात मलमली पैरण, डोक्याला रेशमी गुलाबी फेटा, पांढरं सफेद धोतर पाहून पांडा क्षणभर दुचित झाला. मोट उभी करून न्याहळू लागला आणि मग सायकल दाबीत जवळ आलेला पाहुणा त्यानं ओळखला.

' राम राम पाहुणं.'

' राम राम. ' 'पाहुणा' पृष्ठ क्र. ७९

वरीलप्रमाणे पाटील अनेक कथांना प्रारंभ आकर्षक करतात. त्यामुळे वाचक कथा पुढे वाचत राहतो. तो तिथेच थांबत नाही. हे पाटलांच्या लेखणीचे खास वैशिष्ट असल्याचे दिसून येते.

## २) औत्सुंक्यपूर्ण विकास

पाटील कथांचा विकास हा औत्सुक्यपूर्ण करतात. त्यामुळे कथेत पुढे काय पुढे काय असे वाचकाला वाटत राहते. वाचकाला उत्सुकता लागून राहते.

'कैची' कथेचा विकास पाहण्यासारखा आहे कथेमधील चंदर हा विधवा बाई घरी आणण्यासाठी तयार असतो तो खूपच अस्वस्थ असतो. तो घरचा, समाजाचा काहीच विचार करत नाही. तो केवळ त्या बाईचाच विचार करत असतो. मनातून खूप अस्वस्थ असतो. भाकरी घेऊन येणाऱ्या रामाला मात्र तो हा सर्व प्रकार बोलून दाखवण्याचे ठरवतो आणि त्याची वाट पाहत बसतो. भाकरी घेऊन आलेल्या रामाला तो हा सर्व विचार बोलून दाखवतो, आणि तू माझ्याबरोबर सोबत म्हणून यायचे असेही तो बोलतो.

रामा चंदरचे सर्व बोलणे ऐकून घेतो, इथे कथेचा विकास होतो वाटत राहते, रामा चंदरला मदत करेल. चंदर रामाला म्हणतो –

"चंदर हातात एक दगड खेळवीत म्हणाला,
'त्या बाईला आणायला.'
रामा एरबाडला, आक्रीत ऐकावं तसा चेहरा करून त्यानं विचारलं,
'इकडं ? '
'व्हय. '
'मळ्याकडं येती नौका कवा कवा ? '
येती खरं, पण हितंच ठेवायची हाय तिला कायमची ठेवायची.
रामाला हा वेडेपणा वाटला. " 'कैची' पृष्ठ क्र. २६

हा संवाद वाचल्यानंतर कथेचा विकास इथे होतो आहे असे वाटते कारण रामा हा चंदरला मदत करेल अशी वाचकाला आशा वाटते. इथे कथेचा विकास आहे.

'लूट' कथेमध्येही असा औत्सुक्यपूर्ण विकास पाटील करतात. कथेमध्ये कोंड्या हा तमाशातली बाई घरी आणतो. तो सुखात असतो पण ती सगुणा सुंदर असल्यामुळे तिला नेण्यासाठी इतर लोकं टपलेली असतात. ही बातमी तुका घेऊन येतो. त्यावेळी तुकालाच मदतीसाठी थांब असे कोंड्या सांगतो. त्यावेळी दोघेजण सावधगिरी बाळगतात व हत्यारे सज्ज ठेवतात. लुटारूंची वाट बघत बसतात. इथे कथेचा विकास होतो आहे.

याचे वर्णन करताना पाटील लिहितात –

"मग बऱ्याच वेळानं तिकडून प्रतिसाद मिळेना असं दिसताच तुका आणि कोंड्या शांत उभे राहिले. कानोसा घेऊ लागले, पण कुठूनच काही आवाज येईना. अंधारात पेटणारी बॅटरीही दिसेनाशी झाली. त्या शांत वातावरणात ओढ्याची खळखळ मात्र ऐकू येत होती.

थोड्या वेळानं कोंड्या बाजल्यावर टेकत बोलला,

' न्हाटली वाटतं ! '

' आरं, दबा धरून बसली असतीली. '

' आपून सावद असायचं. '

जरा दगाड गोळा करून ठिवूया. " 'लूट' पृष्ठ क्र. ७७

अशाप्रकारे पाटील कथेचा विकास करतात. त्यात उत्सुकता लावून ठेवलेली असते.

'पाहुणा' कथेमधला बाळासाब हा लग्न नको म्हणून मामाकडे येतो. मामा त्याला आधार देतो. 'लग्न नको' या पाठीमागचे कारण शोधण्याचा प्रयत्न करतो, इथे कथेचा विकास होतो आहे. पाटील लिहितात –

' मंजी ! '

' मंजी काय ! झालंच तसं '

' पर काय झालं ? ' म्हाताऱ्यानं विचारलं.

' काय पोरगी पसंत न्हाय काय तुला ? ' पांडानं विचारलं.

' पोरगी पसंत असून काय करायचं ? '

' तर काय हुंड्यात कमतरता हाय का ? '

' तेही न्हाय '

' मग सांग की धडा धडा काय ते ? तुझ्या आबाला सांगून लगीन रहित करतो आमी. ' म्हातारा चढ्या आवाजात बोलला. " 'पाहुणा' पृष्ठ क्र. ८१

आपणास वाटते मामाने बाळासाबचे लग्न रहित केले असेल. त्याच्या घरच्यांची समजूत घातली असेल हे वाचण्यासाठी वाचक कथा पुढे वाचत राहतो. इथे कथेचा विकास होतो आहे.

## ३) अनपेक्षित अखेर

पाटलांच्या कथेचा विकास आणि वाचकांच्या मनातील कथेचा विकास यात खूप मोठा फरक आहे. वाचकाला वाटते तसे घडतच नाही तर पाटील अनपेक्षित कलाटनी देतात. आणि अपेक्षेपेक्षा वेगळे अखेर करतात. ती अखेर वाचकाला खिळवून ठेवते. अशीच अनपेक्षित अखेर ते करतात.

या दृष्टीने त्यांच्या 'कैची' कथेची अखेर पाहण्यासारखी आहे. 'कैची' कथेतील चंदर हा विधवा स्त्रीला घरी आणण्याचा विचार करतो. यासाठी आपला मित्र रामा याची मदत मागतो. वाचकास वाटते आता निश्चितच चंदर त्या विधवा स्त्रीला घरी आणेल. पण तसे होत नाही. पाटील अनपेक्षित अखेर करताना लिहितात –

"चंदरच्या डोक्यात घण पडल्यागत होऊ लागलं. भनीची निरागस मूर्ती दिसू लागली ..... तिकडं सिताफळीच्या झाडाखाली ती वाट बघत असलेली दिसू लागली. आतुरतेनं .... कुठं पावलं वाजली तर ती बावरत असंल .........

चंदरच डोकंच फिरलं. कैचीत सापडल्यागत झालं. त्याचं पाय थरथरू लागलं. मातीचा ढिगारा त्याच्याभोवती फिरू लागला. काळ्यामाळ्या केल्यागत वाटू लागलं. चांदण्याचा छत गरगर फिरू लागला. त्याचा वेळ वाढू लागला.

चंदरला घेरी आली. तो मटकन बसला, गुडघ्यात मान खुपसून. छत फिरतच होता, आभाळ गोल घुमत होतं, झाडं पळत होती आणि चंद्र उगवून वर येत होता." 'कैची' पृष्ठ क्र. २८

असे होण्याचे कारण म्हणजे त्याच्या मनातले द्वंद्व होय. आपले कुटुंब, प्रतिष्ठा, घरी असलेली लग्नाची बहीण यांच्या विचारांनी तो भोवंडून जातो व आपल्या बहीणीला चांगले स्थळ मिळावे, कुळाला बट्टा लागू नये म्हणून आपल्या विचारापासून परावृत्त होतो. त्या बाईचा विचार सोडून देतो. असा कथेचा अनपेक्षित शेवट पाटील करतात.

'लूट' कथेमध्येही कोंड्याने पळवून आणलेल्या सुगंधाला लोक नेतील असे वाचकाला वाटत राहते पण तसे न घडता अंधारात चुकून कोंड्याची काळी बायकोच ते पळवतात. आणि कणगीत लपून बसलेली सुगंधा तशीच राहते. असा शेवट 'लूट' कथेचा पाटील करतात. आणि या अनपेक्षित धक्क्याने वाचक आनंदीत होतो.

ते लिहितात –

"आणि काही वेळातचं कोंड्याचं बांधलेलं हात अंधारात कोणीतरी सोडू लागलं, तसं कोंड्यानं न्याहाळून पाहिलं आणि आनंदानं तो जवळजवळ किंचाळलाच,

' सगुणां SS सगुणे '

आणि त्याला संपूर्ण मोकळा करीत ती म्हणाली, ' आवं, मीच समजून माझ्या सवतीला त्येनी पळवून न्हेली नौका! ... मी जुंधळ्याच्या टोपल्यात दडून बसलेवते ...' 'लूट' पृष्ठ क्र. ७८

'पाहुणा' कथेतील मामाकडे आलेला बाळासाब याला लग्न नको असते म्हणून तो आश्रयासाठी मामाकडे येतो. आपणासा वाटते की, मामा त्याला ठेवून घेईल आणि बाळासाबच्या घरच्यांना सांगून त्याचे लग्न रहित करतील पण तसे घडतच नाही तर मामा युक्ती करतात आणि आपल्या मुलगी बरोबर बाळासाबचे लग्न लावतात. वाचकाला असे घडेल असे वाटतसुद्धा नाही. पण तसे घडते असा कथेचा अनपेक्षित शेवट करताना पाटील लिहितात –

' बाळासाबानं सगळं ओळखलं. एकानं त्याला हाताला धरून पाटावर उभं केलं.'

' हं पेरावा करा, मुहूर्त टळंल, सा वाजायला आलं. '

आणि एवढ्यात हिरवा चुडा भरलेली त्याच्या मामाची काळीकुट्ट पोरगी समोरच्या पाटावर आणून उभी केली. तांदूळ पडून गजर झाला तरी बाळासाब भिरमाटल्या सारखा उभाच होता." 'पाहुणा' पृष्ठ क्र. ८८,८९

अशा प्रकारे पाटील प्रत्येक कथेचा शेवट अनपेक्षित असाच करतात. म्हणून त्यांच्या या अनपेक्षित शेवटाबाबत आणि काही कथांच्या बाबतीत महादेव मोरे म्हणतात —

"आ. हेन्री. पद्धतीने शेवटी अनपेक्षित कलाटणी देऊन वाचकांना चकीत करणाऱ्या बऱ्याच कथा रंगरावांनी लिहिलेल्या आहेत. 'लूट' 'पाहुणा' 'कैची' 'फणा' 'जोडणी' अशा कथा आहेत. " ५

एकंदर कलाटणी देणारे तंत्र हे पाटलांच्या लेखनीचा खास विशेष असल्याचे आपणास दिसून येते.

## ६) वातावरण निर्मिती

रंगराव बापू पाटील आपल्या 'भोवरा' या कथासंग्रहामधून अनेक प्रकारची वातावरण निर्मिती करतात. त्यामध्ये भीतीचे वातावरण, अस्वस्थ वातावरण निर्मिती करतात. अतिशयोक्तीपूर्ण विनोदी असेही वातावरणनिर्मिती ते करतात.

### १) आनंदी वातावरण

रंगराव बापू पाटील आपल्या कथामधून आनंदी वातावरण निर्मिती करतात. 'भोवरा' कथेमधून चंदरने खरसुंडीसिद्धासनं नवीन पाडं आणलेलं होतं त्यावेळी तो त्या पाडयाला गाडीला जुंपतो आणि चंदरने गाडीत बसण्यासाठी सदावाणी याला बोलावतो. त्यावेळी गाण्याची ओळ गात सदावाणी गाडीकडे येतो. पणनंतर मात्र ही बैल गाडी उधळतात. आणि त्यांची फजीती होते. सुरवातीला त्यांच्या मनातला आनंद व्यक्त करताना पाटील लिहितात –

"ए ऽऽ सदा। बस गाडीत. तसा सदा वाणी गाडीकडं पळत 'हवा में उडता जाये' ही हिंदी गाण्याची ओळ गुणगुणत आला. गाडीत दोन्ही बावकाडं जाम धरुन बसल्यावर चंदरनं बैलाचं कासरं सैल सोडलं आणि चाबकाचं फटकं वडलं. गाडीतली माणसं टणाटणा उडू लागली." 'भोवरा' पृष्ठ क्र.९

नव्या पाड्याच्या खरेदीमुळे चंदरला झालेला आनंद, वडिलांना वाईट वाटणे, इतरांनी चंदरची स्तुती करणे आणि नव्या पाड्याने गाडी हवेत उडवत नेणे यातून हे आनंदी वातावरण निर्माण होते.

## २) अंधश्रद्धेचे वातावरण

रंगराव बापू पाटील आपल्या कथामधून अंधश्रद्धेचे वातावरण निर्मिती करतात. 'भोवरा' कथेमधून बैलाच्या पाठीवर भोवरा बघून जी चर्चा होते त्यातून लोकमानसातील अंधश्रद्धा स्पष्ट होत जाते. चंदर पाडं विकण्याचे ठरवितो, पण पाठीवर भोवरा असल्यामुळे ते पाडं कोणीही घेण्यास तयार होत नाही. त्यामुळे ते पाडं कोणाला विकायचे हा प्रश्न निर्माण होतो. या कथेतून मग अंधश्रद्धेची वातावरण निर्मिती होत जाते.

"शेवटी दलाल सुभान्याकडं तोंड वळवून म्हणाला, 'सुभा। तू का पाडं घिनास रं?'

'हं ! आमाला द्या दाडलां। भवरा हाय पाठीवर बैलाच्या. कुणाचा तरी कोथळा फोडून रिकामं हुईल ते पाडं। लई अपशकूनी असलं पाडं। '

'जरा सावधगिरीनं वागायचं रं। '

'एवढं कंच्या देवानं सांगितलयं? असं सुभान्या म्हणाला आणि झटक्यात उठला. म्हणाला, जातो. अजून भाकरी खायची हाय.'

'बस की रं, जाचील। '

'नगं. बसा तुमीचं.' 'भोवरा' पृष्ठ क्र.१४

## ३) अस्वस्थ वातावरण

अस्वस्थ वातावरण मनोदर्शन घडविणारे वातावरण रंगराव पाटलांच्या काही कथामधून येते. उदा. 'कैची' ही कथेमधील चंदर हा एका विधवा बाईला घरी आणण्याचा विचार करतो. तिला कशी आणायची या विषयी त्याच्या मनात विचार सुरु असतात. तो अस्वस्थ असतो. त्याचे अस्वस्थपणा दाखविताना पाटील लिहितात –

"चंदर वाकळंच्या घडीवर एकटाचं पान खात बसला होता. लाकडी माचावर त्यानं वाकळंची घडी टाकली होती. आणि त्यावर तो आलकट पालकट घालून बसला होता. त्याचं मन सारखं चलबिचल होत होतं ....... काय कराव नृ काय नको हेच सुचत नव्हतं. विचार करुन डोक्यात किडं पडल्यागत वाटत होतं काय निश्चय होत नव्हता. मन सरड्यागत रंग बदलत होतं.

कंदील लावून त्यानं नुकताच सपरातल्या मेढीच्या खोंबाऱ्याला आडकविला होता. त्या स्वच्छ काचेतनं अर्धा चंद्र दिसावा तशी ज्योत तेवत होती. सपरात लख्ख प्रकाश होता. पण त्याचं मन काळोखात चाचपडत होतं.

तंबाखूची चिमट त्यानं दाढंला सोडली आणि घोंगड्याचा बोळा करुन उशाला घेतला. उताणा पडून वर बघू लागला ....... सपरातल्या भसक्यातनं चांदण्या दिसत होत्या. त्यातनं वारं भिरभिरत होतं. पलीकडच्या शेळक्याच्या मळयातनं बोलणी ऐकु येत होती. मधनचं मळयातली एखादी धनछडी अंधाराच्या पाटीवर कर्कश आवाजाची रेघ मारुन जामत होती. पण चंदरचं चित्त थाऱ्यावर नव्हतं. त्याचं मन सारखं बोलत होतं. दुसरं मन त्याला साथ देत होतं." 'कैंची' पृष्ठ क्र. १७

## ४) आतुर वातावरण

बाईला भेटण्यासाठी आतुर झालेल्या चंदरचे मन सारखा तिचाच विचार करत असतो. असे आतुर वातावरण 'कैची' ह्या कथेत आले आहे. पहा –

"बाईशिवाय त्याला काहीच सुचेना. मन तिच्याभोवती घारवाडागत घिरटू लागलं ...... त्या अंधाराच्या पाण्यात तिची सफेद पातळ नेसलेली गोरीपान, रसरशीत काया रुप घेऊ लागली आणि त्याचं मन त्याच्याशी बोलू लागलं. आरं, इतका नादावलायसं तर ठेविनासका मळ्यात तिला. मळ्याचीबी राकानं हुईलं ....... संध्याकाळनं तुला सोबत हुईल. मळ्याला, सपराला सोबा ईल." 'कैची' पृष्ठ क्र. १९

## ५) मनाचे गारठणे व्यक्त करणारे वातावरण

असे मनाचे वातावरण 'कैची' कथेमधून आलेले आहे. तो चंदर बाईचा विचार करतो. पण आपण तिला आणू शकू का? असे चंदरला वाटत राहते. तो रामाची वाट पहात असलेला असतो. पण त्याचे मन हळूहळू गारठून जात असते. तिला आणणे होणार नाही असे त्याला वाटत असते. त्याचे मन दर्शविणारे वातावरण पाटील पुढील शब्दात व्यक्त करतात.

"चंदर सपरातनं बाहेर आला. थंड वाऱ्याचा एक झोत त्याला कुरवाळून गेला तो धावेवर आला. मग हिरी जवळ टाकलेल्या उंच मातीच्या ढिगाऱ्यावर चढला.

— रामानं हाळी द्यावी का?

— कशाला? ईल आता.

तो मातीच्या ढिगाऱ्यावर तसाच बसलां. अंग गारठू लागलं म्हणून दोन्ही तळहात त्याने काखेत खुपसले. चवडसावर बसून उगीच टकामका पाहत राहीला.

कर्दळीगत काळाकुट्ट अंधार पसरला होता. वर चांदण्याला निळाभोर छत लखाकत होता. झाडं काकडून आकसून उभी होती. वाऱ्याचा झोतावर लिंबारा मंद झूलतं होता. रातकिडे किरकिरत होते. काजवे लुकलुकत होते." 'कैची' पृष्ठ क्र. २५,२६

## ६) भीतीचे वातावरण

भय हा मानवी जीवनातला घटक. रंगरावांच्या काही कथामधून तो आला आहे. भयाचे वातावरण त्यांच्या 'फणा' या कथेत आलेले आहे. या कथेतील किसन हा रानातून वैरण न घेताच परत येतो. त्याला साप दिसतो. तो घाबरलेल्या अवस्थेत घरी येतो आणि तो बायकोला हाक मारतो. तो गारठलेला असतो. असे वातावरण निर्मिती करताना पाटील लिहितात —

"किसन अचानक रानातनं आला. आपल्या अंगणात येऊन अंगातनं वारं गेल्यागत जोत्यावर बसलां. घाबऱ्या घाबऱ्या त्यानं बायकोला हाक मारली, 'आंग s ऐकू आलं का?' आणि रंजीस मनानं तो उगीचच आभाळाकडे बघू लागलां. काखोटीचं कतई पटक्याचं भेंडोळ त्यानं सोप्याला भिरकावलं आणि पुन्हा हाक मारली. 'आग, काय करतीयास? भाईर ये जरा.'

डुईवर पदर घेत तरातरा ती सोप्यात आली. आणि तिनं विचारलं, 'का व?'

लवकर परत आलासा? वैरण काढली न्हाई सा?

निळ्या आभाळातल्या पाढऱ्या ठिपक्याकडे बघतं किसन बोलला, 'आग, आता कशाची वैरण काढतीयास?'

'मंजी? ' घाबरुन तिनं विचारलं आन् जोत्यावर येऊन किसनच्या चेहऱ्याकडे काळजीनं बघू लागली.

किसन पाक भेदरुन गेला होता. चेहरा उतरला होता. त्यावरती टकलाई पार नाहीशी झाली होती. अंग गळाठून गेलं होतं. एखादया येड्यागत किसन जोत्यावर बसला होता. अंगातनं वारं गेलेला माणूस बसावा तसा." 'फणा' पृष्ठ क्र. २९

## ७) अतिशयोक्तीचे वातावरण

अतिशयोक्ती पूर्ण असे वातावरण 'फणा' कथेत आले. किसनला साप दिसतो हे खरे आहे. परंतु दुसऱ्या लोकांच्यामध्ये वेगळेच बोलणे सुरु होते. किसनला देवाचा साप दिसतो. तो त्याच्याबरोबर बोलतो आणि म्हणतो तू काय म्हंटलावतास वळक? वगैरे बोलणे लोकांच्यरमध्ये चाललेले असते. हे चित्रित करताना पाटील लिहितात –

"किसननं हे ऐकलं आणि त्याच्या अंगावर काटाच उभा राहिला.

दिवे लागणीला देवमामा केसू अर्धल्याच्यात गेला. तपकीर वडायलां बायका जमल्या तसा देवमामा बोललां

'किसनाला देवाचा साप दिसलां. सुपाएवढी फडी काढलीवती.'

बायकांनी पुढ काहीतरी विचारलं तेव्हा देवमामानं सांगितलं.

'चांगला मागं लागलावता आणिक फणा काढून म्हणतूय काय?'

'कुणाला? किसनला?'

काय म्हंटला साप?

म्हंटला तू काय म्हंटलावतास वळक ..... तुला आटवानं हाय का?

'असा म्हंटला?' बबीन विचारलं.

'व्हय.'

'साप बोलतूय?'

'व्हय हे वाटंना म्हणून तुजारपूरच्या माणसास्नी आणणार हाय.' 'फणा' पृष्ठ क्र. ३२,३३

## ८) विनोदी वातावरण

विनोद हे पाटलांच्या कथेचे एक अंग. त्यामुळे त्यांच्या कथेत विनोदी वातावरणाचे काही नमुने दिसतात. पाटलांनी विनोदी वातावरण 'चैनी' कथमध्ये निर्माण केलेले आहे. भात कापायला असलेले लोक चैनी करायची ठरवतात. आणि मटन आणून दारु पिऊन चैनी करतात. पण त्यातील म्हादा हा सर्वाची गंमत बघतो. हे वर्णन करताना पाटील लिहितात—

"हसून हसून पोटात दुखाय लागलं. मंडळी खरकाव्या ताटातनी लोळाय लागली. कमालनं तर चुनिच्या दगडालाच उसं दिलं आणि डोक्याला चांगला चटका बसल्यावर काढून घेतलं.

'हितं इस्तू कुणी ठेवलारं? ..... मळा पेटवा मळा। तुमी एक गडी घावलायसा .......' आणि लोळत दुसरीकडं गेला. म्हादा गाडीत उठून बसला आणि बळनचं वराडला,

'आरं ए SSS हिरीकडं कोण गेलायं त्यो। हिरीत ढासळचीलाकी लेका!' तशी मामा, मोक्या, हरिबा आणि कमाल सप्पय बसली मामा डुलत डुलतच बराळला

'हिरीजवळ? कोण हिरीजवळ गेलाय? ....... मी गेलुया का तू? ...... छप्पराकडं देवाचं दंडस्तानं घालत गेल्यागत तो गेला. दत्तुमामा मधीच डोळं फाडून बघायचा आणि म्हादाला म्हणयचा.'

'म्हादा S आभाळ कसं फिरतय रं? '

'तू काळयामाळया करतुयस तेनं आभाळ फिरतयं!' 'चैनी' पृष्ठ क्र. ६२

सारेजण दारु प्यालेले त्याचे हे विपरीत वागणे, बोलणे टिपून पाटलांनी सारे वातावरण विनोदाने भारले आहे.

## ९) सावधगिरीचे वातावरण

सावधगिरीचे वातावरण पाटील 'लूट' कथेतून निर्माण करतात. कोंड्या ह्याने तमाशातील सुगंधा नावाची बाई घरी आणून ठेवलेली असते. पण तिच्यावर इतर लोकांचा डोळा असतो. तिला पळवून नेण्यासाठी लोक येणार आहेत ही बातमी तुका कोंड्याला सांगतो. त्यावेळी सावधगिरी म्हणून कोंड्या कुऱ्हाड सज्ज ठेवतो. हे चित्रित करताना पाटील लिहितात —

'माझी फरशी कुऱ्हाड आण.'

'अगं बाई। हे काय? '

'आण म्हणतूय न्हवं? ' त्यानं डोळे वटारले. तशी ती अंगणातून तुरुतुरु चालत आत गेली. फरशी कुऱ्हाडीचं पातं आणून तिनं त्याच्याजवळं दिलं. तो गरजला.

'निसणा आणं' तिनं फरशीला धार लावायचा दगड आणला. तिला उमगेना. तिचं काळीज घाबरंघुबरं झालं. तो अंगणात चवड्यावर बसून फरशीला धार लावू लागला.

सगूणा एक हात कमरेवर ठेवून आणि एका पायावर भार देऊन त्याच्याकडे टकटक पाहत होती. आणि तो दात खाऊन फरशीला धार लावीत होता. फरशी लखलखत होती. तिला धार चढत होती आणि त्या उगळण्याचा आवाज सगुणाचे काळीज चिरत जात होता. तिनं धडधडत्या काळजानं विचारलं,

'काय आरंभलयं तरी काय?' 'लुट' पृष्ठ क्र. ७४

## १०) मनाचे गूढ उकलणारे वातावरण

'माघारीण' कथेमधील बाबू खूप दिवस बायकोला माहेरी ठेवतो. नंतर काही दिवसांनी बायको येते. त्यावेळी सासू आणि सून या दोघींची भांडणे लागतात. त्यावेळी विष्णू बाबूचे मन जाणून घेण्यासाठी प्रयत्न करतो तो प्रयत्न त्याने बाबूला काही प्रश्न विचारुन केलेला आहे. साहजीकच बाबूच्या मनातील गूढ उकलले जाते. या दोन मित्रांच्या संवादातून मनाची गूढता स्पष्ट होत जाते. वातावरण निर्मिती खुलत जाते.

"मग आवाज थोडा बारीक करुन बाबू म्हणाला

'एकत्र असताना सवतर आईन ईक घालायचं ठरीवलतं.'

'खरं म्हणतूयास काय?'

'तर काय? कुठ तिच्या म्हायाराला वाघाची मिशी पैदा कराय गेलीवती. म्हण ..... '

'तवापस्नं शाना झालो अन् सैतंत्र सौसार उभा केला.'

'इक घालायं तिचं काय डोस्कं फिरलंवतं काय?'

'डोस्क ठिकाणाव हुतं म्हणून तरी असलं व्याप करायला लागली.'

'मजी? ' विष्णून न ओळखून विचारलं.

'तिच्या पोराला संबंध जमीन द्यायापाई बारा भानगडी करीत बसली.'

विष्णूला हे आयकून धडकीच बसली. मग डोक्यावरती टोपी काढून त्यानं जमीनीवर ठेवली. गार वाऱ्याच्या झुळकीनं त्याच्या डोळयाला बरं वाटलं. कमरंची पानाची पिशवी सोडीत तो म्हणाला.

'बरं झालं गड्या!'" 'माघारीण' पृष्ठ क्र. ९२,९३

## ११) मनोदर्शन घडविणारे वातावरण

पाटलांच्या अनेक कथामध्ये सूक्ष्म मनोदर्शन आले आहे. त्यांच्या 'जोडणी' कथेत मनोदर्शन घडविणारे वातावरण येते. दत्तू माळ्याचा भात काढायला आलेला असतो. तो भात आपल्या पदरात पडतोय की नाही याची भीती त्याला असते. कारण पावसाची चिन्हे दिसत असतात. माळ्याला झोपही लागत नाही. त्याचे मनोदर्शन पाटील पुढीलप्रमाणे घडवितात–

"दत्तू माळी झोपलावता. त्याला झोप लागत नव्हती. उगच आभाळ गडगडल्यागत आवाज यायचा आणि तो दचकून उठायचा. कान देऊन ऐकायचा. बायकोला उठवून इचारायचा,

'आभाळ वाजलं काय गं?'

'कुठलं आभाळ वाजलं। झोपा उगचं आभाळात ढगाचा ठिप्पुस न्हाय नं कुठलं आलं आभाळ तुमाला? पण त्याला काय ते खरं वाटायचं न्हाय. तो उठून अंगणात यायचा. काळयामाळ्या घुंगुरमाळ्या केल्यागत आभाळात बघायचा. डोळं फाडून बघायचा. निळंभोर आभाळ चांदण्याचा सडा शिंपून खदाखदा हसत असलेलं दिसायचं. पुन्हा त्याचा डुलका लागतोय न तोच ढोलं बडीवल्यावानी पुन्हा आभाळ गरजल्यागत वाटायचं. पुन्हा तो डोक्यावरचं पांघरुण काढायचा? बाहेर यायचा आभाळात चांदण्या लुकलुकलेल्या चधून झोपायचा." 'जोडणी' पृष्ठ क्र. ११०

वरीलप्रकारे पाटील आपल्या  कथामधून वेगवेगळया प्रकारची वातावरण निर्मिती करतात. त्यामध्ये कधी अस्वस्थता आहे तर कधी मनोदर्शन आहे. त्याचबरोबर कधी त्यामध्ये विनोद आलेला आहे. तर कधी अतिशयोक्ती. कधी भीती तर कधी मनाचे गारठणे व्यक्त झालेले आहे. असे विविध प्रकारची वातावरण निर्मिती करणे हे पाटलांच्या लेखणीचे खास वैशिष्टय आहे.

## ७) संवाद

नाट्य व कथा लेखनामध्ये संवादाला अत्यंत महत्वपूर्ण स्थान असल्याचे दिसून येते. संवाद हे छोटेखानी असणे आवश्यक आहे. असे संवाद वाचकाच्या मनाची पकड घेतात. संवाद हे आशय संपन्न असावेत. संवादाच्या बाबतीत विचार केला तर रंगराव बापू पाटील यांच्या कथामधील संवाद हे ग्रामीण बोलीतील असल्याचे दिसून येतात. त्यामध्ये सहज, चटकदार, उल्लेखनीय असे विविध प्रकारचे संवाद आपणांस दिसून येतात.

### १) उल्लेखनिय  संवाद

'दुपार' या कथेतील संवादाच्या प्रयोजन पाहण्यासारखी आहे. मनातले भय कमी व्हावे व वाट ओसरावा म्हणून चंदर आपल्या बायकोबरोबर बोलतो आहे.

'आगं, बोल की काय तरी!'

'काय बोलू? घसा सुकुन गेलाया ......... '

'कायतरी बोल की मजी वाट वसारती ..... ' 'दुपार' पृष्ठ क्र. ४४

एकदा बोलणे सुरु होते आणि मग ज्या विषयाचे भय वाटत होते त्याकडेच गाडी येते. त्याची बायको विचारते –

'मामाजीस्नी मारणारी माणसं तुमाला म्हाईत हुती का?'

'आदी म्हाइत नव्हतं. मोठा झालो आणि आईनं सगळं सांगितलं.'

'कोण त्यो?'

'महिपा डवंग!'

'अन् मामांजीस्नी माराय तेंच काय टक्कुरं बिघडलवतं काय ...... ?'

' टक्कुरं कशानं बिघाडतयं !'

'मग?'

'गावंदरीच्या जिमणीच्या पायात भांडण हुती?'" 'दुपार' पृष्ठ क्र. ४५

## २) चटकदार संवाद

'चैनी' कथेमध्ये आलेले म्हादा आणि हरिबा, त्याचे मित्र हे चैनी करायचे ठरवतात. मटन आणतात. ते शिजवतात. त्यावेळी प्रत्येकजण जेवायला आतूर झालेला आहे. त्यावेळी त्यांच्यामधला हा पुढील संवाद आहे. कोण म्हणत असते 'बास झाले', कोण म्हणत असते मी फकत 'रसाच खाणार' असा हा संवाद आहे.

"आ लेका. बास, बास, बास "

'एवढं पुरलं काय?'

'चिक्कार झालं.'

'मी नुसता रसाच वरपणार!'

'आमची दोन–तिन वाटयात गंडारनी!'

तो पर्यंत म्हादानं बाटलीचा बूच काढला.

'हं. छलारं योक योक ...... मामाSS '

'घ्या. घ्या ' 'चैनी' पृष्ठ क्र. ५९

'जोडणी' कथेमधील आंदू हा भात काढाय आलाय म्हणून माणसे सांगायला जातो. तेव्हा तो सगुणाच्या घरी त्यावेळी आंदू सुगंधाला सांगतो. एक पारखी भात काढायला ये. लवकर पहाटे ये असे तो म्हणतो त्यावेळचा सुगंधा आणि आंदू या दोघामधला हा संवाद आहे. सगुणावर आंदू प्रेम करतो आहे.

'सुगंधा! '

'का वं आणिक काय इसारलं!'

'एक पारखी बरं का'

'व्हय भात काढायचं मजी सकाळचीच की जुडणी असतीया.'

'आणि तू जरा लवकर ये पाटं पाटं ये मजी तिथं जागा बिगा लुटून काढून जरा तयारी करुन ठिवाय जमलं.' 'जोडणी' पृष्ठ क्र. १०९

## ३) सहज संवाद

पुढील संवाद 'पाहूणा' कथेमधील बाळासाब हा लग्न करायला नको म्हणून मामाकडे पळून येतो. त्यावेळी त्याचे मामा आणि बाळासाब या दोघामधील हा संवाद आहे. मामने बाळासाबची केलेली चौकशी संवादामध्ये आलेली आहे.

'बाळासाब कवासा आलाय?'

'हे आत्ताच की।'

'मला दिसला न्हाईस.'

'तूमी पाणी पाजीत हूता.' 'पाहुणा' पृष्ठ क्र. ८०,८१

असाच सहज संवाद 'भोवरा' कथेत आलेला आहे. चंदर हा खरसुंडीसिद्धास्नं बैलाच नवीन पाडं विकत आणतो. त्यावेळी सुभान्याने केलेली चौकशी यातून हा संवाद अविष्कृत झालेला आहे.

'काय किती बसलं रं?'

'आठराशे'

'भवराबिवरा हाय काय?'

'हाय की।'

'कुठसा?'

'पाठीवर'

'मग मेलो चित्ताड तेच्यायला। '

'का रं? '

'लई खुडील असतं असलं जनावर।' 'भोवरा' पृष्ठ क्र. ५

## ४) मनाचे तळ शोधणारे संवाद

पुढील संवादामधून 'पाहुणा' कथेमधील मामा हा बाळासाबच्या मनात काय आहे पाहण्याचा प्रयत्न करतात. बाळासाब हा लग्न नको म्हणत आहे. या पाठीमागे काय कारण आहे हे मामा बाळासाबला विचारतो आहे. त्यात पांडाही आहे.

'मंजी? '

'मंजी काय। झालचं तसं'

'पर काय झालं? ' म्हाताऱ्यानं विचारलं.

'काय पोरगी पसंत न्हाय काय तुला? ' पांडानं विचारलं.

'पोरगी पसंत असून काय करायचं? '

'तर काय हुंड्यात कमतरता हाय का? '

'ते बी न्हाय.'

'मग सांग की घडा घडा काय ते? तुझ्या आबाला सांगून लगीन रहित करतो आमी.'

'पाहुणा' पृष्ठ क्र. ८१

हा पुढील संवाद सावत्र आई विषयी बाबू विष्णूला सांगतो आहे. तो संवाद 'माघारिण' कथेमध्ये आलेला आहे. बाबूच्या मनात सावत्र आईविषयी काय मत आहे हे विष्णू जाणून घेतो आहे. त्यावेळी बाबू सांगतो आई मला मारणार होती.

'एकतर असताना सवतर आईनं ईक घालायचं ठरीवलवतं ...... '

'खरं म्हणतुयस काय?'

'तर काय? कुठं तिच्या म्हायाराला वाघाची मिशी नैदा कराय गेलीवती म्हणं .... तवापसनं शाना झालो अन् सौतंत्र सौंसार उभा केला.'

'इक घालाय तिचं काय डोस्कं फिरलवतं काय? '

'डोस्कं ठिकाणावं हुतं म्हणून तरी आलं व्याप करायला लागली.'

'माघारीण' पृष्ठ क्र. १२

## ५) प्रसंगातील संवाद

पुढील संवाद हा बायकोला आणायला गेलेला चंदर आणि रस्त्यात भेटलेल्या गाडीवान या दोघाचां आहे. कोणत्या गावचे पाहुणे असे त्याने विचारले आहे.

'कोण गांव पावणं? '

'भडकिंब. आपून? 'चंदरही विचारलं.

'मालंवाडी.'

'काय बेत?'

'निघालूय तुमच्याच गावाला ...... येताय काय?' 'दुपार' पृष्ठ क्र. ४९

'फणा' कथेमधील किसन हा सापाला घाबरलेला आहे. तो घरी परतल्यानंतर त्याची आई विचारते आहे. 'कसा आलासं' तेव्हा किसन मी कुपावरुन उडी मारुन आलो आहे असे सांगतो आहे. त्यावेळचा हा संवाद आहे.

'मग'

'मग काय? कुपणावरनं उडी टाकून आलो?'

'बरं झालं बाळा सुटलास ते। '

'आता ते जनावर तिथनं हाटतय काय?'

'बरं झालं बाळा सुटलास ते। '

'उद्या बघ भेटतूय काय?'

'पण कुठं पदरं पडंल हे सांगता सेत न्हाय.' 'फणा' पृष्ठ क्र. ३१

## ६) तिरकस संवाद

'जोडणी' कथेमधील दत्तु माळ्याचा भात काढायला आलेला आहे. त्यावेळी कोणीतरी त्याला सांगते. भात काढाय आलेला आहे. भात काढून घे. नाहीतर विनाकरण मजा होईल. माणसे मिळत नसली तर घरातच सुरवात कर. त्यावेळी पोरगा आणि तू दोघांनीच सुरवात कर असे सांगितले जाते त्यावेळी हा संवाद येतो.

'का ठेवलं असचीलं गा आता हे?'

'का मज्जा करुन घ्याची हाय?'

'ठेवायला मला काय हौस हाय व्हय?'

'का म्हटलं रानाची सोभा बघायलां ठिवलायसं'

'रानच आमची मजा बघाय लागलंय की।'

'कवा नाय ते पीक बेजम आलयं आणि एक '

'माणूस म्हटलं तर मिळनां ....... '

'घरातच काढा की। ........ '

'घरात काढाय माणसं हायती कुठं?'

'पोरगा न् तू कर की जुमी ......... ' 'जोडणी' पृष्ठ क्र. १०२

असे वेगवेगळया प्रकारचे संवाद पाटलांच्या कथेमधून आलेले असहेत. त्यामध्ये कधी त्यामध्ये प्रसंगनिष्ठता आहे, कधी ते संवाद मानवी मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न करतात असे हे संवाद आहेत.

## ८) ग्रामीण जीवनाचे सूक्ष्मनिरीक्षण

रंगराव बापू पाटील मानवी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करतात. त्यामध्ये माणसांच्या वेगवेगळया सवयी, लकबीने सार्थ पणे टिपतात. तसेच प्राणीजीवनाचे आणि स्त्री निरीक्षण ते सूक्ष्म पातळीवर करतात आणि आपल्या लेखनीने ते साकार करतात. निसर्ग निरीक्षणही ते करतात. ते पुढीलप्रमाणे

## १) मानवी वर्तनाचे सूक्ष्मनिरीक्षण

### सवय

मानवी वर्तनाचे सुक्ष्म निरीक्षण पाटील करतात. त्यामध्ये मानवी सवयी टिपलेल्या आहेत. ती सवय चित्रित करताना पाटील लिहितात.

१. 'दि की, म्या खाल्ली आत्ताच ..... पण आकुळी हुती तुझ्याकडं पिंडीची असंल ...... ' 'कैची' पृष्ठ क्र. १९

२. 'चंदरनं चिलमीची राख झाडली. चिलीम तिथचं ठेवली.अन् माचावरच्या वाकळंखालची फरशी कुऱ्हाड काढली. तिचं मे वीतभर पांत मध्यावर आलेल्या चंद्रागत लखाकलं.' 'कैची' पृष्ठ क्र. २५
यातूनं चंदरची चिलीम ओढायची सवय चित्रित झालेली आहे.

३. 'बीडी ओढीत आणि एक डोळा बारीक करत बाबूनं एक चांगला झुरका मारला.' 'माघाणि' पृष्ठ क्र.९१

४. 'म्हातारीनं आणखी तपकीर नाकात कोंबली आणि चवड्यावर बसत म्हणाली.' 'फणा' पृष्ठ क्र. ३१
यातून फणा कथेमधील किसनच्या आईची तपकीर ओढण्याची सवय व बसण्याची पद्धत व्यक्त झालेली आहे.

५. 'मोटेच चाक कर्कश आवाज काढीत होतं मोट पाट भरुन पाणी ओतीत होती. पाण्यातून तांबडी उंबरं, पाला वर येत होता. पांडा खाली गघून मोट हाकीत होता.' 'पाहुणा' पृष्ठ क्र. ७९

वरील वर्णनामधून विविध मानवी सवयीचे सुक्ष्म निरीक्षण येते. त्यामध्ये बीडी ओढायची सवय, तंबाखू खाण्याची सवय, मोट हाकण्याची सवय, चिलीम ओढण्याची सवय अशा विविध सवयी व्यक्त झालेल्या आहेत.

## २) प्राण्याचे निरीक्षण

### १) साप

सापाचे वर्णन करताना ते लिहितात –

"आता तेचं पिवळजरद आंग, काळभोर धाचा आकडा आणि जिभळया चाटणारं त्वांड बघून माझं धाबं दणाणलं." "चांगलं वीत–दीड वीत फडी काढून राजा गुडघाभर उंच उभा होता. शेपटी सळसळत होती. सोनेरी उनात त्याची पिवळीधमक जाळीदार अंगकांती चमकत होती. काळा कुळकुळीत 'दहा' चा आकडा दिसत होता. जनावर जिभळ्या चाटीत होतं." 'फणा' पृष्ठ क्र. ३०,३४

## ३) स्त्री निरीक्षण

स्त्री निरीक्षण करताना पाटील लिहितात.

"मागं बकुळीच्या साखळ्या बोलत होत्या. बांगडया वाजत होत्या. पदर खसखसत होता. नव्या लुगड्याचा वास चंदरच्या नाकाशी भिनत होता." 'दुपार' पृष्ठ क्र. ४३

"एकदा तरी आपल्या मुसुबींच्या बागंत आलीवती. तवा ती पोपटी रंगाचं पातळ नेसून आली हुती ..... हातात हिरवी काकणं हुती. काजळाच बॉट डोळयाला पुसलंवतं. पिकलेल्या मुसुंबीगत पिवळाझार तिचा झंपर हुता. पान खालुवतनं रागवाच्या चुचीगत व्हाट लालगलींद दिसतं हुतं." 'कैची' पृष्ठ क्र. २३,२४

अशा प्रकारे स्त्रीयांचेही सुक्ष्म निरीक्षण पाटील करतात.

## ४) निसर्ग चित्रण

निसर्ग वर्णनाचे बारकावे हे पाटलांच्या कथेचे वैशिष्टय. त्यामध्ये झाडे, डोंगर, पाणंद, मळा, माळ, सीताफळीची झाडे, आब्याची झाडे, बोर, बाभळी , चांदणे इ. निरीक्षणही ते करतात.

"कर्दळीगत काळाकुट्ट अंधार पसरला होता. वर चांदण्याचा निळसभोर छत लकाकत होता. झाडं गारठयात काकडून आकसून उभी होती. वाऱ्याचा झोतावर लिंबारा मंद झुलत होता. रातकिडे किरकिरत होते. काजवे लुकलुकत होते." 'कैची' पृष्ठ क्र. २६

वरील प्रमाणे पाटील मानवी वर्णनाचे, प्राण्यांचे, स्त्रीयांचे, निसर्गाचे सुक्ष्मनिरीक्षण करतात. त्याचे वर्णन करतात. हा त्यांच्या लेखनाचा खास विशेष आहे.

महादेव मोरे म्हणतात —

"श्री रंगराव बापू पाटील यांच्या लेखणीचं खास वैशिष्टय म्हणजे सुक्ष्म निरीक्षण शक्तीनं उभी केलेली ठसठसीत व्यक्तीचित्रं ग्रामीण जीवनाची नस ओळखून खरखुरं जीवन दर्शन घडविण्याची तळमळ त्यांच्या कथातून प्रतीत होते. एखाद्या घटनांप्रसंगात गुरफटलेल्या व्यक्तींच्या मनाचा तळठाव घेण्याचा प्रयत्न कथेत करतात आणि इथेच ही कथा सर्वसामान्य भरड कथेहून उंच झेप घेताना दिसते. " ६

## ९) निसर्ग चित्रण

रंगराव बापू पाटील यांच्या 'भोवरा' या कथा संग्रहामध्ये 'ल्हावर' कथासंग्रहाच्या तुलनेत कमी निसर्ग वर्णन आले आहे. तरी सुद्धा कथांची रंगत वाढविण्यासाठी ते पुरेशे आहे. 'भोवरा' या कथासंग्रहाचा लेखनानुभूतीचा परिसर हा तुजारपूर, कामेरी, इस्लामपूर, भडकिंबे हा आहे.

पाटील यांच्या कथेमधून शेती, झाडेझुडपे, डोंगर, नद्या, गावे, पाणंदी, मंदिरे, ओढे, विहीरी, आकाश चांदणे, काजवे, रातकिडे, पशुपक्षी, साप, कुत्री, बैल इ. वर्णने येतात.

पाटलांच्या कथेतील निसर्ग हा कथेचा जिवंतपणा व्यक्त करण्यासाठी येतो. तो निसर्ग स्वतंत्र येत नाही तर कथेबरोबर येतो. त्यांच्या  कथेतील निसर्ग हा रंगत वाढविण्यासाठी येतो.

पाटलांच्या कथेमधून मळा, माळ, पाणंद सीताफळीची झाडे, लिंग, बाभळी, बोर इ. निसर्गचित्रण येते.

रंगराव बापू पाटील यांच्या कथेतील निसर्ग हा सहज अविष्कृत होतो. तेथे ओढून ताणून निसर्ग आणला जात नाही.

"सुई ऽऽ करुन वयलं वारं आलं आणि भाताचं रान साळ साळ वाजलं. कंबारभर आल्यालं भाताचं पीक कंबरबर हात ठेवून डुलल्यागत हिकडं तिकडं डुलंल. इतइतबर तवरी पडलेलं रान काळोखात बुडाय लागलंवतं. वाऱ्याची एखादी लाट याची आणि धावजवळच्या छपराला थडकून सगळ्या शिवारात दरवळायच्या. पांदीन जाणाऱ्या माणसांच्या तोंडाला पाणी सुटायचं  तेनं. अस रान मदान काढायला आलं होतं. तवरी चांगली पडली होती. पांढरशिपुर तांदूळ हेंदा टच्च भरलं होतं. आणि भात वाऱ्यावर सुगंध सोडीत होता. त्यावासानं स्वास गच्च भरायचा. झुळ कंवर साळीचं पीक मस्त झुलत होतं, डुलत होतं." 'जोडणी' पृष्ठ क्र. १०१

अशाप्रकारे भाताच्या पीकाचे वर्णन पाटील करतात.

'जोडणी' कथेतील आणखी एक वर्णन पाहण्यासारखे आहे.

"पांदीनं साळ साळ बिंडा वाजत आला. आता पांदीची रहदारी मंदावली होती. तासाभरापूर्वी गजबजलेली पाणंद आता शांत झाली होती. ढोरागुरांच्या पावलाचं फुफुट्यातलं ठसं अंधारात छातीशी मुडपून घेऊन पाणंद शांत झाली होती." 'जोडणी' पृष्ठ क्र. १०३

असं उत्कृष्ठ पाणंदीचे वर्णनही पाटील करतात.

'चैनी' कथेत पाटील लिहितात –

"त्या काळ्याकरंद सुपीक पट्टयात तुफान पीक याचं ...... ती पीकं आता अंधारावर दर्प सोडीत होती. कुणाचं भाताचं रान नुकतचं म्हवारलेलं. तो वास श्वासात मावत नव्हता. शिवारातनं उशिरा परतलेली म्हसरं गैर पांदीलाच होती. ठेचकाळत शेपट्या पाठीवर टाकत टपाक् टपाक् करीत निघाली होती. बायाबापटया पांदीनं झपाझपा निघाल्या होत्या." 'चैनी' पृष्ठ क्र. ५४

"हे सगळं होस्तवर रात मदासाला आली होती. हिरीत बेडकं वरडत होती. गावाकडं कुत्र्याचं कोयाळ ऐकू येत होतं. छपरातली जनावरं डोळ झाकून रवंथ करत होती. शिंगमोडका बैल दावणीत मुंडकं टेकून निवांत शेपटी हालवीत पडून राहीला होता." 'चैनी' पृष्ठ क्र. ६१

तसेच 'फणा' कथेत पाटील लिहितात –

"दिवस डोक्यावर आला होता. थंडीचे दिवस होते. उनाच्या चटक्यानं अंग शेकून निघालं होतं. धनछडया आणि व्हले साऱ्या शिवारातनं भरारत होते. चिमण्या धाटाधाटावर बसून कोवळे दाणे टिपीत होत्या." 'फणा' पृष्ठ क्र. ३९

'दुपार' मधील निसर्गवर्णन

"वाटेनं तरवाडाची झाडं होती ...... कुठं तरवाडाच्या झुडपाच्या बुंध्यात व्हल्याची घरटी दिसत होती. वाटेवर चाहूल लागताच एखादा व्हला भुर्रकन उडून जात होता." 'दुपार' पृष्ठ क्र. ४७

'लुट' कथेमधील निसर्गवर्णनही पाहण्यासारखे आहे.

"म्हारवाड्याजवळून जाणाऱ्या ओढ्याचा खळखळ आवाज आता स्पष्ट ऐकू येत होता. लांब अंधारात झाडांचे ठिपके गडद काळे दिसत होते. आणि एक—दोन पक्ष्यांचा चिरका आवाज अंधारातून वेध घेत कोंड्या—तुकाच्या कानांवर येऊन आदळत होता." 'लुट' पृष्ठ क्र. ७६

'माघारीण' कथेत निसर्गवर्णन —

"रात्र अंधाराच्या सोबतीनं भराभरा निघाली होती. निळ्याभोर आकाशात आता ढग दिसत न्हवता. चांदण्या वरवर सरकत होत्या. आणि अंधाराला काजळी चढत होती. लांब गाडीवाटेला गाडी उधळत आल्याचा खडाड् खडाड् आवाज आला." 'माघारीण' पृष्ठ क्र. ९३

अशा प्रकारे विविध प्रकारची निसर्गवर्णने आपणास पाटलांच्या कथामधून पहावयास मिळतात. या निसर्गवर्णनामध्ये झाडे, झुडपे, शेते, मळा, माळरान, पक्षी, जनावरे, व्हले, धनछडया, बेडकं, पाणंद इ.चे वर्णनही पाटील करतात. त्यांच्या निसर्ग चित्रणामध्ये सहजता असल्याचे आपणास दिसते.

पाटलांच्या निसर्ग चित्रणाच्या बाबतील नंदा सुर्वे म्हणतात —

"पाटलांच्या कथेतील निसर्गवर्णने ही अगदी ग्रामीण भागातली आणि ग्रामीण बाजातली आहेत. लेखकाची आस्वादक वृत्ती यातून दिसते. परंतु ही वर्णन पुस्तकात अगदी मोजकीच आलंली आहेत. कथाभाग हेच उद्दिष्ट ठेवल्यामुळेही असेल. परंतु कथेच्या सौंदर्यासाठी याचाही विचार करायला हरकत नाही." ७

एकंदर 'भोवरा' कथासंग्रहातील निसर्ग हा मोजक्याच स्वरुपात आला असून 'ल्हावर' कथासंग्रहाच्या तुलनेने तो कमी प्रमाणात आहे.

## १०) भोवरा कथासंग्रहातील लोक समजुती

रंगराव बापू पाटील यांच्या 'भोवरा' या कथासंग्रहामध्ये लोकजीवन चित्रित झालेले आहे. त्यामधेन लोकसमजूती चित्रित झालेल्या आहेत. या लोक समजुतीमध्ये अंधःश्रद्धा, लोकांच्या विचार करण्याच्या प्रवृत्ती याचे वर्णन करतात. त्या लोकसमजुती आपणास खालीलप्रमाणे सांगता येतील.

'किसनला देवाचा साप दिसलां. सुपाएवढी फडी काढलीवती.'

'बायकांनी पुढं काहीतरी विचारलं तेव्हा देवमामानं सांगितलं.'

'चांगला मागं लागलावता आणिक फणा काढून म्हणतूय काय? '

'कुणाला? किसनला? '

'व्हय किसनलाच.'

'काय म्हटंला साप? '

'म्हटंला, तू काय म्हंटलावतास वळक ..... '

'तुला आटवनं हाय का?' 'फणा' पृष्ठ क्र. ३२,३३

'लई दांडगं जनावर बाबा. तेच्या वाटलां जावू नका।'

'आश्शेल नाग हाय.'

'देवाचा आसलं.'

किसनं बोलला,

'राजा शिवारातनं हिंडाय लागला की उदकाडी पेटल्यागत वास सुटतुय.'

माणसं तिथचं बसली. एकजण बोलला,

'त्या वाटंन येवू नको आता दुसऱ्याच वाटंनं येत जा.' 'फणा' पृष्ठ क्र. ३५

"भाताच्या केवड्याचा पानागत वास सुटायचा. वासाच्या तांदळागत भात सुगंध सोडत होतं. दत्तु माळ्यानं संबंध तांदूळ वासातनं केलाय अशी भूमका गावात पसरली होती. तेची शेतसरी सोनं घिवून आलीवती. शिवारातलं माणूस न माणूस बघून जात होतं. कुणाला बरं वाटत हुतं, कुणाला वाईट. हा देशपांड्याचा मळा माळयाला कुळकायद्यानं घावला होता. आता भाताचं रान बघून तर अनेक माणसांचा ह्यो मळा आपल्याला घावला असता तर लई बरं झालं असतं, असं वाटतं हुतं, त्यात माळ्यानं तिथं जुनी हीर उपसून अधिकच जोर केला होता. " 'जोडणी' पृष्ठ क्र. १०६

अशा प्रकारे भोवरा कथासंग्रहामधून लोकसमजूतीची उदाहरणे येतात. त्याचबरोबर अंध:श्रद्धेचीही काही उदाहरणे येतात. त्यामध्ये —

१. "कायतरी निवद—नारळ चुकला आसलं." 'फणा' पृष्ठ क्र. ३१

२. "वाईच जुंधळं आणा कौल लावू" 'फणा' पृष्ठ क्र. ३२

३. हं आमाला द्या दाडंला। भोवरा हाय पाटीवर बैलाच्या, कुणाचा तरी कोथळा फोडून रिकामं हुईल ते पाडं! लई अपशकुनी असलं पाडं." 'भोवरा' पृष्ठ क्र. १०४

एकंदर 'भोवरा' कथासंग्रहामध्ये लोकसमजुती आणि अंध:श्रद्धाही चित्रित होताना दिसतात.

## ११) भाषाशैली

भाषाशैलीच्या बाबतीत विचार केला तर असे दिसते की, 'भोवरा' कथासंग्रहाची भाषा ही ग्रामीण भाषा आहे. कथासंग्रहामध्ये वर्णने, निवेदने, संवाद ही ग्रामीण भाषेतच आहेत. हे पाटलांच्या भाषाशैलीचे वैशिष्ट्य आहे.

पाटलांच्या कथेतील भाषाही कुठेही कृत्रीम वाटत नाही म्हणून नंदा सुर्वे म्हणतात –

"अनेक ढंगदार कथा 'भोवरा' संग्रहात आहेत. पाहुणा, माघारीण, जोडणी या कथाही ग्रामीण वातावरणाचा वेगळाच परिचय घडवून देतात. लेखकाची निरीक्षणवृत्ती तर यात दिसतेच पण त्याच्या अनुभवक्षेत्राचं प्रतिबिंब असावं असं वाटतं. इतकं ते अकृत्रिम पद्धतीनं आलयं. कथा कुठे शब्दबंबाळ झालेल्या दिसत नाहीत. अकारण नाट्यमयही होत नाहीत." ८

पाटलांच्या भाषाशैलीची वैशिष्टे आपणास खालीलप्रमाणे सांगता येतील –

## १) अलंकारीक भाषाशैली

अ) **रुपक**

'मन सारखं वारंपानी होत होतं.'

ब) **उपमा**

१. 'बाभळीगत टणाक हायसा की।'

२. 'दलालाची चिलीम आगगाडीच्या धुराड्यागत धूर सोडीत होती.'

३. 'मन सरड्यागत रंग बदलत होतं.'

४. 'लढाई करुन पडावं तशी जागोजाग सगळी पडली होती.'

५. 'नुकतंच बंद झालेलं इंजिन जरा हॅंडेल मारताच सुरु व्हावं तसा बाळूच्या तोंडाचा पट्टा सुरु झाला.'

६. 'खळ्यात कणसं खायाला घुसणाऱ्या खोंडास्नी मुस्कं घालून पातीला धरावं तसं झालं चंदरला'

७. 'एखादं भुजंग घनावा तसा एकरावर भाताचा सुगंध दरवळत आला.'

८. 'मळा कसा सोन्यागत वाटतुय तुला.'

## २) भाषेचे वर्णन सामर्थ्य

पाटलांच्या वर्णनसामर्थ्याची उदाहरणे आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. 'पुंगीवर डुलवा तसा राजा डुलत होता. फडी काढून थेट उभा होता. मागं आसूडागत शेपटी सळसळत होती. फडी मागं झुकवून राजा कुऱ्यात उभा होता.मधून मधून डुलत होता, ठिसकारत होता, जिभळया चाटीत होता. फणा वाढत होती. कमी होत होती. दोन बारीक डोळे काचेच्या मण्यागत लुकलुकत होते. फडीखाली पांढरी जाळीदार पट्टी होती. आणि नागराज हिरव्याचार गवतावर सळसळ करीत होता.' 'फणा' पृष्ठ क्र. ३५

२. 'मागं बकुळीच्या साखळ्या बोलत होत्या. बांगड्या वाजत होत्या. पदर खसखसत होता. नव्या लुगड्याचा वास वंदरच्या नाकाशी भिनत होता. तान्ह्या पोराचा धोंचा आणि त्यावरचं नारिंगी गोंड हाचलं होत आणि धसका बसल्यागत चंदर टकामका इकडं–तिकडं बघतं होता. गावाच्या दिशेनं चालत होता. ऊन भर बाराचं .... कडक उन्हाळा ..... वाटेला माणूस नाही ..... जमीन विस्तवासारखी तापलेली ..... तशात ही जोडी बिगी बिगी चालली होती ...... डोळ्यांच्या बुबुळांना उनाच्या झळा सोसवत नव्हत्या. ' 'दुपार' पृष्ठ क्र. ४३

३. 'उनाच्या झळा अंगाला चाटून जात होत्या. पिवळ्या कुसळाच्या माळावरुन एक तांबडीभडक वाट भडकिंब्याच्या दिशेनं गेली होती. त्या वाटेनं दोघेजण आपल्या गावाला चालले होते. चंदर सासरवाडीस्नं बायकोला घेऊन आला होता. बकुळी आपल्या दाल्ल्याच्या गावाला चालली होती. धोंचा घातलेलं तान्हं पोर बकुळीनं आपल्या काखेत घेतलं.' 'दुपार' पृष्ठ क्र. ४२

४. 'आता गाव जवळ आलं होतं. ओढ्यावरची फरशी बोलण्याच्या नादात कधी मागं पडली तेही कुणाला कळलं नाही. देशपांडेचा मळा तर कवाच मागं पडला होता. आता म्हारवाड्यातला कालवा स्पष्ट ऐकू येत होता. ग्रामपंचायतीचं दिवं तर कवाचं पेटलं होत .....' 'चैनी' पृष्ठ क्र. ५५

५. 'असं ठरलं आणि सगळे सटाटा उठले. म्हादा घरला सुटला. सगळ्यांनी अगोदर जलदी भाकऱ्या ठोकाय सांगितल्या. आणि जसेच दुकानाकडे सुटले. दोन रुपयाचा सौदा घ्याचा तिथं तीन रुपयाचा घेतला. रसा भनाट झाला पायजे असं कमालचं म्हणणं होत. मग सगळ्यांच्या,

भाकरी गोळा केल्या. पसापसा चटणी कांद्याच्या चिंगळ्या घेतल्या. हरिबानं स्वत:च्या खिशातलं पैशानं पान, सुपारी, कातं सगळं घेतलं. चार–पाच मणेर पुड्या घेतल्या. भामानं पुन्नाचं डबं फुल्लभरुन घेतलं. कमालचं आगबंद बिडीबंडल घेतला.' 'चैनी' पृष्ठ क्र. ५७

६. 'पितळया बाटकी आली. कप–थाटल्या घेतल्या लोटक्यातलं पाणी घेऊन उगचं बोटाचं शेंडकं वल्ल केलं. सर्वांनी आपआपल्या भाकरी मोडून घेतल्या. रश्याचं पात्यालं मधी घेऊन पंगत बसली. चांगली जुपी झाली आणि कोण कुणावर बोलनां. नुस्ता भुरक्याचा आवाज येवू लागला. सगळीच रश्याचा व फोडांचा नादाला लागली. तिकटाजाळ रश्यानं कानात झिणझिण्या येत होत्या.' 'चैनी' पृष्ठ क्र. ६१

७. 'माणसानं माणूस जमू लागलं. सोप्यात गर्दी झाली विष्णूनं घोरपड्याच्या दुकानातून बिडीबंडल, काड्याची पेटी, कातसुपारी आणली. पाहुणे एक एक बिडी घेऊन झुरके मारीत बसले. अंगाला आळोखे पिळोखे देऊ लागले. ताठलेली हाडं कडाडा मोडून वाजू लागली. कुणी मागंच रेलून पडला.' 'माघारीण' पृष्ठ क्र. ९४

अशाप्रकारे भाषेच्या वर्णनसामर्थ्याची काही उदाहरणे आपणास सांगता येतील. ज्या वर्णनामधून तो प्रसंग लहान मोठ्या हालचाली पाटील यांनी आपल्या सार्थ शब्दात टिपलेला आहे. हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्टय आहे.

## क) औत्सुक्यपूर्ण भाषाशैली

रंगराव बापू पाटील यांच्या कथेमधून उत्सुकता लावून ठेवतात. हे त्यांच्या भाषाशैलीचे वैशिष्टय आहे. हे आपणास खालील उदाहरणावरुन दिसून येते.

"किसननं चेष्टा केली ती त्यानं ओळखली. गर्दीतून कुणीतरी बुवामहाराजांचा कैवार घेतला. किसनला त्यानं खडसावलं, 'तुझ्या बानं तरी हजाराची नोट बघीतलीवती का?'

किसनं खदाखदा हसला हे पाहून बंवा संतापला, कोपला. त्याचे डोळे लाल इंगळागत झाले. माणसांनी किसनाला खुळ्यात काढलं.

बुवामहाराज गांज्या ओढत असत. महाराजाजवळची जवळ जवळ तीनशे रुपयाची गांज्या किसननं चोरली. बुवान ते अंतर्ज्ञानानं ओळखलं. आणि मग त्यानं किसनला एक चिठ्ठीवर लिहून दाखवलं.

' ..... सहा महिन्याच्या आत तुला कळेल .... ' बुवाचा शाप आता खरा ठरत होता. किसनचं मन आता पश्चातापानं भरुन गेलं होतं. " 'फणा' पृष्ठ क्र. ३७

'भानगड तरी काय कळू द्या.'

आणि मग मोटेच्या चाकाकडं पाहत पाहुणा म्हणाला,

'भानगड काय तशी इशेष न्हाय.'

'न्हाय? पांडानं नाडयावर बसतं विचारलं.'

'म्हंटली तर हाय अन् म्हंटली तर न्हायबी.' 'पाहुणा' पृष्ठ क्र. ८०

रंगराव बापू पाटील कशी उत्सुकता लावून ठेवतात ते इथे लक्षात येते नेमके काय घडलेले आहे पाहण्यासाठी वाचक कथा पुढे वाचत राहतो.

## ४) सूचक भाषाशैली

पाटील आपल्या भाषेतून सूचकताही व्यक्त करतात.

"लांब न्हाय हे खरं, पर बिनघोरी गावात पोचलं मजी झालं!

'तुमाला कसला आलाय घोर?'

चंदरन चालता चालता पटक्याच्या शेमल्यानं चेहरा पुसला आणि म्हणाला,

'तुला म्हाइती न्हाय व्हय मला भ्या हाय ते। ..... गाठलं कुठंतरी टग्यांनी मजी .... "

'दुपार' पृष्ठ क्र. ४२

चंदरने वडिलांना मारलेल्या व्यक्तीचा खून केलेला असतो. ही भीती त्याला आहे. ही भीती वरील सूचकतेतून व्यक्त झालेली आहे.

पुढील उदाहरणामधूनही सूचकता व्यक्त झालेली आहे. 'पाहुणा' कथेतील बाळासाब मामाकडे येतो. त्याला लग्न नको असते. नंतर मामा विचार करतो आणि आपली पोरगी बाळासाबला देण्याचे ठरवितो त्यासाठी तो पांडाला बोलावून घेतो आणि त्याच्या कानात काही तरी सांगतो. आणि लग्नाची तयारी करतात. आणि बाळासाबच्या गळ्यात आपली काळी पोरगी बांधतो ही सूचकता व्यक्त करताना पाटील लिहितात –

"आणि विजेचा झटका बसावा तसा म्हातारा खाडकन् जागा झाला. पटका काखोटीला मारुन मांडवाबाहेर आला. उसाच्या रानात नजर टाकली. लख्ख उन्हात नीट दिसून येत नव्हतं, बुबुळांना पांढरं ऊन सहन होत नव्हतं."

'हिकडं ये सांगतो तुला.'

असं म्हणून म्हाताऱ्यानं पोराला जवळं बोलाविलं आणि चवड्यावर बसून दोघं काही कुजबुजत बसले आणि बऱ्याचं वेळानं म्हातारा म्हणाला,

'मग उठ बघू सटक्यानं.'

'शेवाळेकाकाला सांगू व्हय सगळं?'

'हं.'

मांडवाच्या कुडात खूपसून ठेवलेली टोपी पांडान घातली, पायताण घातलं आणि धोतराचा घोळ हातात धरुन तो गावाच्या दिशेनं सुटलां" 'पाहुणा' पृष्ठ क्र. ८५,८६

अशीच सूचकता पांटलांनी 'दुपार' कथेच्या सुरवातीलाच व्यक्त केलेली आहे. बकुळीचा पदर बोरीच्या फांदीत अडकतो म्हणजे मार्गात काटे आहेत. अडचणी आहेत. ही सुचना मिळते. ही सूचकता व्यक्त करताना पाटील लिहितात –

"चालता चालता बकुळीचा पदर बोरीच्या फांदीत उटकला आणि बकुळी थांबली मागे वळून ती नव्याकोर लुगड्याचा हिरवा पदर बोरीच्या काट्यातून काढू लागली. हाताला काटे अधिकच बोचू लागले. ती फांदीत अडकलेला पदर सोडवून घेत होती." 'दुपार' पृष्ठ क्र. ४१

अशी पाटील वेगवेगळ्या प्रकारची सूचकता व्यक्त करतात.

## ५) ग्रामीण भाषाशैली

रंगराव बापू पाटील यांच्या प्रत्येक कथेची भाषाशैलीही ग्रामीण भाषाशैली आहे. ग्रामीणकथा ग्रामीण भाषेतूनच अविष्कृत करणे हे पाटलांचे खास वैशिष्टय आहे. ते लिहितात –

"तिचंबी बराबरच हाय ...... बिग्याला तू मालक ...... मळादला हाय ..... बावडी हाय ..... तरणं रगात हाय .... तीबी सूजीच्या पिटागत गूरी हाय ..... मग ठेवलीस म्हणून का बाची पदरमोड हुतीया? ...... असली रुपवान बाई ठेवलीसं तर लोक नशीब काढलसं म्हंतेली ...... अशा ठेवलेल्या कैक बायांच्या पायांत लक्ष्मी असती म्हंतेती." 'कैची' पृष्ठ क्र. २०

अशीच ग्रामीण भाषाशैली आपणास पुढील उदाहरणामधून पाहता येईल –

"ह्यो तेच्या अंगावर थुंकतूय – त्यो तेच्या अंगावर थुंकतूय. थुंकायची ईर्शाच चाललीवती. आयला! पाक पैरणी रॅड केल्यासा। आरं तुमाला आवरता आवरता मला पुरं झालं। दारु पिऊन जगात कुणी असं केलं असॅल का? ...... सगळीजण एकमेकाच्या तोंडाकडं बघाय लागली, 'लेकानु मालकांची जर आशा पैरणी बघीतल्या तर तुमच्या वाघानू। "'चैनी' पृष्ठ क्र. ६७

## ६) ग्रामीण शब्दकला

रंगराव पाटील आपल्या कथेमधून ग्रामीण शब्दकला वापरतात. उदा. पिवळीहाडूळ, इठुळं, गठूळं, चौखुर, बायाबाबटया, टोळकं, तिकाटजाळं, झॅक, कोयंडं, आकबंद, छाकदिशी, बटाक्कन, कालवा, सप्पय, खुर्दुला, काखोटी, खुळ्यागत, जोडणी, जुपी, बचकंएवढं, थाऱ्यावर, कंच्याबी, इदमान, दमछाक, इचारलवतं, बुलीवलंय, शानपण, ऐचान, घाबरीघट्ट, खदाखदा, कैवार, इंगळागत इ.

## ७) निसर्गप्रतीमा संपन्न भाषा

कथेची रंगत वाढवण्यासाठी पाटील निसर्ग प्रतीमांचा वापर करतात. त्यामुळे कथा रंगतदार बनते. उदा.

"कर्दळीगत काळाकुट्ट अंधार पसरला होता. वर चांदण्याचा निळंभोर छत लकाकत होता. झाडं गारठ्यात काकडून आकसून उभी होती. वाऱ्याचा झोतावर लिंबारा मंद झुलत होता. रातकिडे किरकिरत होते. काजवे लुकलुकत होते." 'कैची' पृष्ठ क्र. २६

याशिवाय सोनेरी ऊन, उनाची कढत वाफ निळभोर आकाश, गार वारा, भाताचा वास, केवड्याचा पानागत येत होता. ढगाचा ठिपूस इ. निसर्ग प्रतीमांचा वापर करतात.

म्हणून वासुदेव मुलाटे म्हणतात –

"प्रतीमांच्या वापरामुळेही भाषेचे सामर्थ्य वाढते रंगराव बापू पाटील यांच्या कथेतून हेच प्रत्ययाला येते." [९]

## ८) वाक्यप्रचाराचा वापर

पाटलांच्या शैलीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या 'भोवरा' कथासंग्रहातील भाषाशैलीमध्ये वाक्यव्रचाराचा वापर असल्याचे आपणास दिसते. ते वाक्याप्रचार आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

| | |
|---|---|
| १) मन वारं पाणी होणं | २) जिवाची घालमेल होणं |
| ३) धाबं दणाणने | ४) न्हाती धुती होणं |
| ५) थैमान घालणे | ६) जीव टांगणीला लागणे |
| ७) सुस्कारा सोडणे | ८) निरखून बघणे |
| ९) काळजाचं पाणीपाणी होणं | १०) बिनघोरी होणं इ. |

वासुदेव मुलाटे म्हणतात –

"अर्थाच्या तीव्र प्रतितीसाठी लोकमानसामधील वाक्यप्रचारांचा वापर केला जातो. रंगराव बापू पाटील याचाही परिणामकारकपणे वापर केला आहे. " १०

## ९) भाषेतील विनोदाचे सामर्थ्य

१. "मग हरिबा भेलकंडत उठला छपराबाहेरच्या वल्ल्या वैरणीच्या ढिगातनं एक खच्चून कवळाभरुन वैरण घेतली आणि छपरात गेला. जनावरांच्या तोंडाकडं टाकायची ती बैलाच्या ढुंगणाकडं इस्काटली. आणि वैरण टाकून बैलांना म्हणाला.
'खावा बाबानू। आमी दारु पिलूय. आमी चैनी केलीया ...... तुमीबी चैनी करा.' 'चैनी' पृष्ठ क्र. ६२

२. "म्हादा ऽ आभाळ कसं फिरतयं रं ?
'तू काळ्यामाळ्या करतूयस तेनं आभाळ फिरतयं।'
तेवढ्यात हरिबा भुरुला घातल्यागत करुन म्हणाला, 'ए, ऽ मामा काळ्यामाळ्या करु नगसं, हिरीत पडशिल।' " 'चैनी' पृष्ठ क्र. ६३

३. 'हाऱ्या गाडी हाणकी सवनं' म्हादा.
'काय? मी गाडीत हाय? '
'नीट गाडी हाण. धुऱ्याव घालशिल.' तसं हरिबानं डोळं चोळलं. चाबूक चापून धरला आणि समोर पांढऱ्या दिसणाऱ्या आकृतीवर जोरानं ओढला." 'चैनी' पृष्ठ क्र. ६९

४. “तीन बैल कसं रं ह्या गाडीला? ...... आयला ह्या बैलाच्या। ...... दोनाची तीन हुतेती। ’ असं म्हणून हरिबानं चाबकाचा कोयंडा चांगला चापून धरला. चिपळ्याचा चाबूक चांगला खाळ खाळ हलीवला आणि एका ओळीत आलेल्या तीनं पांढऱ्या आकृतीवर खाड्कन उडीवला. यात मोक्या पुन्हा धावला. मामा आणि लालभाशापण धावली. त्या सपाट्यांनं गाडीकडं सरकत गेलेल्या कमाललां चाबकाचा आवाज आला, ‘ए ऽऽ तोटं कोण उडीवतुय रं? .... दिवाळी अजून लांब हाय म्हणावं। हरिबानं चाबूक टाकला आणि ही काय गाडी न्हवं, निराळीच भानगडं दिसतीय असं आळखून तो कलंडला थंड मातीत वर बघत पडला.” ‘चैनी’ पृष्ठ क्र. ६४

५. “‘आयला ह्या पावसाच्या। काय थेंब म्हणायचा का काय?’ म्हादा पुन्हा धोतर सावरुन गाडीत चढला. बावकाडावर बसून उगीच पान चघळीत राहीला. पुन्हा तोंडात चांगला भरपूर रस होवू दिला तो तोंडात मावेना तसा तो उठला आणि गाडीतनंच जोराची पिचकारी हाणून एका पिचकारीत तीन गढी भरीवलं.” ‘चैनी’ पृष्ठ क्र. ६५

अशी विनोदपूर्ण भाषाशैली पाटलांच्या कथेची असल्याचे दिसून येते.

## १०) स्त्रीवर्णन सामर्थ्य संपन्न भाषा.

रंगराव पाटील ‘भोवरा’ कथासंग्रहामधून स्त्री वर्णनही सार्थपणाने करतात. त्यामध्ये बकुळाचे वर्णन करताना पाटील लिहितात –

“मागं बकुळीच्या साखळ्या बोलत होत्या. बांगडया वाजत होत्या. पदर खसखसत होता. नव्या लुगड्याचा वास चंदरच्या नाकाशी भिनत होता.” ‘दुपार’ पृष्ठ क्र. ४३

“मग टोपपदराचं नवं कोर लुगडं नेसलेली बाबूची बायको गाडीतून हलकेच खाली उतरली. निऱ्याचा घोळ सावरीत अंगाला नाजूक हेलकावे देत ती आत गेली. तिच्या पायातल्यां चांदीच्या साखळ्या क्षणभर बाबूच्या डोळ्यात झळाळल्या. ” ‘माघारीण’ पृष्ठ क्र. ९३

अशाप्रकारे स्त्रीयांच्या अंगावरची साडी, चालणे, घातलेले दागीने याविषयी सुक्ष्मनिरीक्षण करुन त्या स्त्रीचे सार्थवर्णन पाटील करतात.

## ११) भाषेतील प्रादेशिक छटा

रंगराव पाटलांच्या कथामधून काही प्रादेशिकतेच्या छटाही दिसतात. त्यामध्ये 'दुपार' कथेमध्ये भडकिंबे या परिसराचा उल्लेख आलेला आहे. त्या प्रदेशातच ती कथा घडते आहे ही प्रादेशिकतेची छटा पाटील पुढीलप्रमाणे व्यक्त करतात –

"टेकाडं चढून गाडी वर आली ...... भडकिंब दिसू लागलं ...... भैरुबाचं चुन्यानं रंगविलेलं देऊळ दिसू लागलं. त्याला लावलेलं भिंग चकाकू लागलं. कळस चकाकू लागलं." 'दुपार' पृष्ठ क्र. ५०

## १२) विशिष्ट वाक्यरचना

पाटील विशिष्ट वाक्यरचना आपल्या भाषाशैलीच्या माध्यमातून करतात. ती वाक्ये आपल्या मनात राहून जातात. ती वाक्ये पुढीलप्रमाणे –

१. "रांजणात तांब्या बटाक्कन बुडवून ती घेऊन आली." 'फणा' पृष्ठ क्र. २९

२. "अंधार आणि गारठा मळ्यावर तरंगत होता." 'चैनी' पृष्ठ क्र. ५३

३. "तिचा चेहरा पांढरा फटफटीत दिसत होता." 'दुपार' पृष्ठ क्र. ४४

पाटलांच्या भाषाशैलीच्या बाबतीत वासुदेव मुलाटे म्हणतात –

"रंगराव पाटीलांच शैलीदार निवेदन आणि ग्रामीण जीवनातील छोटेछोटे प्रसंग याद्वारे ते आपल्या कथा फुलवीत नेतात. कथेची सुटसुटीत नीटस मांडणी आणि विषयाशी सुसंगत प्रसंगनिर्मिती, मनोव्यापार दर्शन यामुळे त्यांची कथा अधिक वाचनीय होते." ११

एकदंर पाटलांचा 'भोवरा' कथा संग्रहाची भाषाशैली अशी वेगवेगळ्या गुणवैशिष्टयांनी नटलेली आहे. त्यामध्ये कधी उपमा, रुपक आहेत. तसेच कधी विनोदाची किनार आहे. तसेच या भाषेमधून कधी सूचकता व्यक्त होते आहे. भाषेचे वर्णन सामर्थ्य तर पाहण्यासारखे आहे म्हणून त्यांचा 'भोवरा' कथासंग्रह सार्थ ठरतो व तो ग्रामीण कथेमध्ये भर घालतो.

# संदर्भ


| अ.न. | लेखक | पुस्तक/लेख |
|---|---|---|
| १. | सुर्वे नंदा | मर्यादित गरगरणारा 'भोवरा'<br>महाराष्ट्र टाईम्स, २३ जानेवारी, १९९४. |
| २. | सुर्वे नंदा | मर्यादित गरगरणारा 'भोवरा'<br>महाराष्ट्र टाईम्स, २३ जानेवारी, १९९४. |
| ३. | डॉ. तोडकर वी. रा. | 'दुपार' कथेचे परीक्षण<br>'कमल' कलावाङ्मय चर्चासत्रातील मत, १९६५. |
| ४. | मोरे महादेव | 'भोवरा' संग्रहाच्या निमित्ताने<br>रविवार पुरवणी, ९ जानेवारी, १९९४. |
| ५. | मोरे महादेव | 'भोवरा' संग्रहाच्या निमित्ताने<br>रविवार पुरवणी, ९ जानेवारी, १९९४. |
| ६. | मोरे महादेव | 'भोवरा' संग्रहाच्या निमित्ताने<br>रविवार पुरवणी, ९ जानेवारी, १९९४. |
| ७. | सुर्वे नंदा | मर्यादित गरगरणारा 'भोवरा'<br>महाराष्ट्र टाईम्स, २३ जानेवारी, १९९४. |
| ८. | सुर्वे नंदा | मर्यादित गरगरणारा 'भोवरा'<br>महाराष्ट्र टाईम्स, २३ जानेवारी, १९९४. |
| ९. | डॉ. मुलाटे वासुदेव | ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास<br>साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद.<br>प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९२, पृष्ठ क्र.२६५. |

१०. डॉ. मुलाटे वासुदेव ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास
साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद.
प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९२, पृष्ठ क्र.२६५.

११. डॉ. मुलाटे वासुदेव ग्रामीण कथा स्वरुप आणि विकास
साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद.
प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९२, पृष्ठ क्र.८०.

टीप

प्रस्तुत काही संदर्भ लेखकाकडे उपलब्ध असलेल्या लेखामधून घेतलेले आहेत. त्यांचे प्रसिद्धी दिनांक नाहीत.